१०२ शतकोत्तर वाटचाल


एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, शनिवार ७ डिसेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-८१, पाने-८, किंमत : ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 81, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 7 December, 2024 Page- 8 Price- Rs. 7/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com



## रेपो रेट पुन्हा जैसे थे

**मुंबई** - रिझर्व्ह बँकेंचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज जाहीर केलेल्या पतधोरणात रेपो दर पुन्हा एकदा ६.५ टक्केच कायम ठेवला आहे. रिझर्व्ह बँकेच्या तिमाही पतधोरण समितीच्या मागील दहा बैठकांमध्ये घेतलेली भूमिका सलग ११ व्या बैठकीतही कायम ठेवण्यात आली आहे. देशात वाढलेला महागाईचा दर आणि मंदावलेली अर्थगती या कारणांमुळे रिझर्व्ह बँकेने रेपो दर ६.५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला,असे बोलले जात आहे. गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ संपत आला असून, ही त्यांच्या कार्यकाळातील अंतिम पतधोरण बैठक होती.

खुर्ची क्रमांक २२२

# काँग्रेसच्या खासदाराचे आसन खुर्ची खाली ५०० रुपयांचे नोटांचे बंडल सापडले



**आज संसदीय अधिवेशनात अदानी विषयावर गोंधळ न होता काँग्रेसच्या खासदाराच्या खुर्चीखाली नोटांचे बंडल सापडल्याने मोठा गदारोळ झाला. आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्या आणि राज्यसभा दिवसभरासाठी स्थगित झाली.**



■ नवी दिल्ली

**आज** राज्यसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर सभापती जगदीप धनखड यांनी निवेदन केले की, राज्यसभा सभागृह काल तहकूब झाल्यानंतर खुर्ची क्रमांक २२२ यांच्या खुर्चीखाली नोटांचे बंडल सापडले. ही अत्यंत गंभीर बाब असून, याबाबत सखोल चौकशी केली जाईल. सभापती धनखड यांनी ही घोषणा करताच प्रचंड गदारोळ झाला. सभापतींनी या प्रकरणाची गुपचूप चौकशी न करता ही माहिती सभागृहात का दिली हा प्रश्न सर्वात आधी उपस्थित झाला. खुर्ची क्रमांक २२२ हे सर्वोच्च न्यायालयाचे निष्णांत वकील आणि काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांचे आसन असते. यावरच नोटांचे बंडल सापडले, असे जाहीर करण्यात आले. यामुळे काँग्रेसला बदनाम करण्याचा हा प्रयत्न होता का? असा संशय व्यक्त झाला. भाजपाने त्वरित हा मुद्दा हाती घेऊन उच्चस्तरीय समितीकडून या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली. भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, हा सदनाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून, याची चौकशी झाली पाहिजे. स्वत:हा अभिषेक मनू सिंघवी यांनी सांगितले की, काल मी १२.५७ मिनिटांनी राज्यसभा सभागृहात गेलो. त्यानंतर तीनच मिनिटांनी दुपारी १ वाजता सभागृह स्थगित झाले. दुपारी एक ते दीड मी संसदीय इमारतीत जेवण केले आणि मग पुन्हा सर्वोच्च न्यायालयात परत गेलो. माझ्यावर व्यक्त झालेला संशय हा हास्यास्पद आहे. मी राज्यसभेत जाताना नेहमी फक्त ५०० रुपयांची एकच नोट घेऊन जातो. जो प्रकार घडला त्याची चौकशी निश्चित झाली » पान ७ वर

# आजपासून ३ दिवस आमदारांचा शपथविधी हंगामी अध्यक्ष म्हणून कोळंबकरांची निवड

**कालच्या शपथविधीनंतर आज महाराष्ट्रात वरवरची राजकीय शांतता होती. सकाळीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोघे उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांनी चैत्यभूमीला जाऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यानंतर विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून दादर नायगावमधील काँग्रेसचे आमदार कालिदास कोळंबकर यांची निवड करण्यात आली. उद्यापासून तीन दिवस अधिवेशन होणार आहे. उद्या व परवा असे दोन दिवस नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी होईल. त्यानंतर सोमवार ९ डिसेंबर रोजी विधानसभा अध्यक्षांची निवड होईल. १६ डिसेंबरपासून नागपूर येथे विधिमंडळ अधिवेशन सुरू होणार आहे.**

■ मुंबई

**आज** विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून कालिदास कोळंबकर यांची निवड झाल्यानंतर त्यांनी राज्यपालांची भेट घेतली. कालिदास कोळंबकर हे ६ वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. आज त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दिवसभर त्यांच्या सागर बंगल्यावरच होते. अनेक आमदार त्यांच्या भेटीसाठी येत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आजही अदृश्यच राहिले. त्यांनी गृह आणि नगरविकास खाते मागितले आहे ही चर्चा सुरूच होती. दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दादरला सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले.

१६ डिसेंबर ते २१ डिसेंबर विधिमंडळ अधिवेशन असून, त्याआधी खातेवाटप आणि मंत्रिपद वाटप होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आज प्रत्येक



गटाने कोणती खाती मागितली यावरच चर्चा सुरू होती. मात्र अधिकृत कोणतीही घोषणा आज दिवसभरात झाली नाही. ९ डिसेंबरपर्यंत नवीन आमदारांचा शपथविधी आणि अध्यक्षांची निवड ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच खातेवाटप जाहीर होईल, अशी आशा आहे.

## बाबरी मशीद प्रकरणात न्यायाची थट्टा मात्र खटल्याची पाच पाने आशेची किरणे

■ नवी दिल्ली

**माजी न्या.रोहिंटन नरिमन यांचे वक्तव्य**

**अयोध्या** प्रकरणाचा खटला म्हणजे न्यायाची थट्टा होती. परंतु या खटल्यातील पाच पाने ही आशेची किरणे आहेत. ही पाच पाने प्रत्येक कनिष्ठ न्यायालये आणि उच्च न्यायालयासमोर वाचली पाहिजे, असे वक्तव्य सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रोहिंटन नरिमन यांनी केले. भारताचे २६ वे सरन्यायाधीश एएम अहमदी यांच्या स्मरणार्थ स्थापन करण्यात आलेल्या अहमदी फाऊंडेशनतर्फे आयोजित 'धर्मनिरपेक्षता आणि भारतीय संविधान' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

न्यायमूर्ती रोहिंटन नरिमन म्हणाले की, आज आपण पाहतो » पान ७ वर

## आंदोलक शेतकऱ्यांवर अश्रूधुराचा मारा ७ जखमी! तूर्त माघार! उद्या पुन्हा कूच

■ चंदीगड

**दिल्लीकडे** कूच करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांनी शंभू सीमेवरच रोखले. या प्रसंगी पोलीस आणि भारतीय किसान युनियनच्या टिकैत गटाच्या शेतकऱ्यांमध्ये झटापट झाली. पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. त्यात ७



शेतकरी जखमी झाले. त्यानंतर शेतकरी नेते सरवनसिंग पंढेर यांनी शंभू सीमेवरून शेतकऱ्यांना माघारी बोलावले. सरकारने चर्चेसाठी पुढे यावे अन्यथा उद्या पुन्हा दिल्लीकडे कूच केली » पान ७ वर

## हर्षवर्धन पाटील यांचे चालले काय? देवेंद्र फडणवीसांची कुटुंबासह भेट?

■ मुंबई

**इंदापूर** विधानसभा मतदारसंघाची जागा महायुतीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सुटल्याने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हर्षवर्धन पाटील यांनी भाजपाची साथ सोडली आणि तुतारी हाती घेतली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून त्यांनी इंदापूर विधानसभेत अजित पवार गटाचे दत्ता भरणे यांच्याविरुद्ध निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत हर्षवर्धन पाटील यांचा पराभव झाला. या पराभवानंतर महिनाही उलटत नाही तोच हर्षवर्धन पाटील यांनी आज सहकुटुंब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या अशी चर्चा आहे. आता ते पुन्हा शरद पवार गट सोडून भाजपात परतणार अशीही चर्चा सुरू झाली आहे.



# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी महिला मुली/मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC243564}

प्रिंटर, फीडरमन आणि बॉयलर पाहिजे हायडलबर्ग ऑफसेटसाठी उल्हासनगर **9822340170** {NC243511}

रेडीमेड गारमेंट दादरमध्ये अकाऊंटसाठी मुलगी पाहिजे. **022-35023313/ 49735135/ 8898140579** {NC243555}

HDFC बँकेत मुले मुली पाहिजेत पगार 17500- 35500 डायरेक्ट भरती. संपर्क - **72490 97212** {NC243547}

आया, मावशी, वॉर्डबॉय, नर्स, ड्रायव्हर पाहिजेत. (राहणे+ खाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे- **9136404828** {NC243568}

मालाडमध्ये मार्केटिंगसाठी (Male/ Female) आणि हेल्पर पाहिजे. Contact: **8779671363** {NC243566}

बेलापूरमधील गर्व्हमेंन्ट अस्थापना करिता २५ सिक्युरिटी गार्ड, २ सिक्युरिटी सुपरवाइझर त्वरित पाहिजेत. ड्युटी ८ तास, पगार २२,००० ते २५०००, तसेच एक साप्ताहिक सुट्टी, PF, सुविधा. संपर्क- **9082772768/ 9867957361** पत्ता- शार्प सर्व्हिसेस, २०२/२ राजगिर ॲनेक्स, लक्ष्मीबाग, सायन ब्रीजखाली सायन वेस्ट {NC243569}

हेडलबर्ग २ कलर आणि ५ कलर मशीन चालविण्यासाठी अनुभवी प्रिंटर, फिडरमन आणि फॅक्टरीसाठी हाऊसकिपींग पाहिजेत. बाहुबली प्रिंटर्स, ए-२८, घाटकोपर इंडस्ट्रीयल इस्टेट, आर. सिटी मॉलजवळ, घाटकोपर (प.), मुंबई- ४०००८६. 022-**2500 8810/ 9320552709/ 7977185551** {NC243462}

## पाहिजेत

जय अंबे डुप्लेक्स कटींग मशिन (बाइंडर) आणि हेल्पर्स पाहिजे. अंबरनाथ (प.), **8767799009, 9860399009** {NC243499}

सिक्युरिटी गार्ड/ हाऊसकिपींग, जेन्ट्स, लेडीज, पँट्री बॉय, वरळी, दादर, भायखळा, गोवंडी, माटुंगा जोगेश्वरी. **8291056761/ 8422880513** {NC243572}

गोरेगाव (प)- गारमेंट(युनिफॉर्म) फॅक्टरीसाठी शिलाई कारीगर, जेन्टस कटिंग मास्टर पाहिजेत. गोपेश युनिफॉम्स. **8169706810** {NC243523}

अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. भेटा सकाळी ११ ते १२.३० संध्याकाळी ७ ते ८.३० डॉ. खंडेपारकर नर्सिंग होम, डॉ.सर भालचंद्र रोड, दादर (पूर्व) ४०००१४ {NC243517}

अनुभवी स्क्रीन पेंटर पाहिजे, भायखळा घोडपदेव येथे. संपर्कः- **9152770426** {NC243581}

अत्तरच्या (PERFUME BOTTLES) बोटल पॅकिंगसाठी मुली. पाहिजेत. **9930710230** (मुंबई- ४००००३) {NC243582}

१२ तास दिवसपाळी घरामध्ये अनुभवी पेशंटकेअर महिला वेस्टर्नलाईनमध्ये पाहिजेत पगार 19,500/- संपर्क- **9920463209** {NC243580}

२०-४० वयांच्या महिला बोरीबंदरला सुशिक्षित कमी शिकलेल्या १५०००-२५०००. **-8657438844, 9076103969** {NC243584}

बोरीवली येथे ऑफीस कामासाठी हाऊसकिपिंग लेडीज स्टाफ पाहिजे. संपर्कः **8452810618** {NC243585}

कुर्ला येथे फूटवेअर होलसेल डिलीव्हरीकरिता माणूस पाहिजे. संपर्कः **9820627795/ 8369645053** {NC243542}

## पाहिजेत

दादरमधील जाहिरात एजन्सीच्या आर्ट डिपार्टमेंटकरिता इंगजी-मराठी डीटीपी येणारे, कोरल, फोटोशॉपवर काम करणारे ज्युनियर आर्टीस्ट पाहिजेत. अर्जासह भेटाः- सोमवार ९ (सकाळी १०-१२). बी.वाय. पाध्ये पब्लिसिटी, शिवगणेश, बाटा समोरील गल्ली, कबुतर खान्याजवळ, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम) {NC243598}

प्रिंटिंग प्रेससाठी पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, फिडरमन पाहिजेत संपर्क : **9820930362 / 9930589715** {NC243509}

**नोकरी उपलब्ध**

१) डाय प्लेटन पंचिंग मशीन ऑपरेटर (मशीनः ३६" X ४६" इंच)
२) ऑफसेट लेमिनेशन मशीन ऑपरेटर (मशीन : ३०" इंच)
३) प्रॉडक्शन मॅनेजर ऑफसेट प्रिंटिंग जॉब्स आणि संबंधित प्रक्रियेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

• कामाचे ठिकाणः कामन वसई पूर्व
• कामाचे वेळ व स्वरूप : सकाळी १० ते सायंकाळ. ७ (पूर्णवेळ)
• अपेक्षा : मशीनचे योग्य सेटअप करून मशीन चालवणे व त्याचे देखभाल दुरुस्तीची प्राथमिक ज्ञान गरजेचे आहे.
• अनुभवः मशीन ऑपरेट करण्याचा 2-3 वर्षांचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य.
• पगारः१८ ते २५ हजार + ओव्हरटाईम अनुभवानुसार व योग्यतेनुसार.

8080713504
9620751212, 9820441212

सिक्युरिटी - हाऊसकिपिंग कंपनीसाठी सेल्स/मार्केटिंग मॅनेजर, BDM, अकाऊंट, टेलिकॉलर, ऑपरेशन्स / एरिया मॅनेजर, फिल्ड ऑफिसर, सिक्युरिटी गार्ड, सुपरवायझर हाऊसकिपिंग मुलगा/मुलगी पाहिजे. **7208004613 / 14** sales@strictfacilityservices.com {NC243269}

बोरीवली (ईस्ट) गोडाऊन/ डिलीव्हरीसाठी फ्रेशर डिलीव्हरी बॉय पाहिजे. पगार 10,500/- (वय १८ ते ४०). **8655188552** {NC243474}

डोंबिवली मधील डॉट पेस्ट कंट्रोल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ह्या नामांकित कंपनी करीता अनुभवी आणि बिना अनुभवी टेक्निशियन हवे आहेत. संपर्क- **8652211111/ 7208453333** {NC243513}

कंपनीला बँक कामासाठी फुलटाईम / पार्टटाईम मुले पाहिजेत पार्टटाईम बाईक राईडर्स पाहिजेत चांगला पगार अर्ज रेशनकार्डसहित भेटा - दुपारी ११ ते ९ स्पिडलिंक कुरीयर शॉप नं. ३ आनंद अपार्टमेंट तेलीगल्ली क्रॉस रोड अंधेरी पूर्व{NC243454}

## पाहिजेत

ऑफसेट प्रिंटर, कटर, बाईंडर लॅमिनेशन ऑपरेटर, पंचिंग ऑपरेटर, कॉरुगेशन ऑपरेटर, पिनिंग ऑपरेटर, हेल्पर उल्हासनगरसाठी पाहिजेत फोनः **9323258222** {NC243565}

Plants world नर्सरीसाठी अनुभवी माळी पाहिजेत. चर्नीरोड (E) **9920297466/ 8422982797** {NC243573}

गोरेगाव (पूर्व) FEMALE ऑफीस असिस्टंट पाहिजेत. (TALLY ज्ञान आवश्यक). जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. व्हॉटसअपः **8104047320** {NC243477}

झेरॉक्स मशीनकरिता माणूस पाहिजे. राज ग्राफिक्स मस्जिदबंदर पश्चिम संपर्क : **9987357112** {NC243319}

मालाड वेस्टला इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार **9821228223** {NC243472}

Account Assistant पाहिजे (पुरुष) रिटायर्ड व्यक्ती चालेल संपूर्ण माहिती अर्जासह भेटा- नार्वेकर कंपनी, अजंता अपार्टमेंट, ससून डॉक/ कुलाबा बस स्टेशनशेजारी, कुलाबा, मुंबई. {NC243485}

DTP ऑपरेटर बोरीवली इंद्रप्रस्थ, Compulsory CORELDRAW जाणकार मुलगी पाहिजेत, बिनअनुभवी चालेल. संपर्क जलाराम **9820441711/ 9820000538** {NC243466}

वसई पूर्व (तुंगारफाटा) स्थित फॅक्टरीसाठी ऑफीस असिस्टंट पाहिजेत. शिक्षण दहावी पास. आणि फॅक्टरी कामासाठी मुले/मुली पाहिजेत. वेळ 8.30 ते 7pm. **9112153568/ 8605233061** {NC243507}

ऑफसेट प्रिंटिंग कंपनीला प्रिंटिंग सुपरवायझर / पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. अंधेरी मरोळनाका संपर्क - **40134600** भेटण्याची वेळ सकाळी 11.00 ते 4.00 {NC243379}

अंधेरी- पिकअप डिलीव्हरी/ टेली मार्केटिंगसाठी मुले/मुली पाहिजेत. (कुरीयर/कार्गो अनुभव) दुचाकी असणाऱ्यांना प्राधान्य **8655928550** {NC243450}

इमिटेशन कामासाठी अनुभवी मुलगी पाहिजेत, 8 तास- पगार रोज 380- 400, बोरिवली **9967655714** {NC243419}

नामांकित प्रिंटींग प्रेससाठी मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, पंचिंग ऑप्रेटर्स, ऑफिस असिस्टंट, डिलीव्हरीबॉय पाहिजेत. भांडुपः **02249741218 / 9867338302.** {NC243406}

## पाहिजेत

'MEDICAL डिस्ट्रीब्युटरला गोरेगांवमध्ये'- ''अकाऊंटंट'', ''रेक-पीकिंग'', ''डिलीव्हरी बॉय'', ''पॅकींगसाठी''- **8928377811** {NC243483}

जोगेश्वरी ऑफीससाठी फीमेल ऑफीस असिस्टंट पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक- **9820412573** {NC243498}

''घाटकोपर स्थित रियल ईस्टेट कंपनीसाठी महिला कॉम्प्युटर ऑपरेटर आऊटडोअर असिस्टंट आणि वर्कफ्रोम होमकरिता पाहिजेत''. संपर्कः **9323409038** {NC243533}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे. मालाड पूर्व, संपर्क करा :- **9323007778.** {NC243528}

मुले पाहिजेत मशीन चालवणाऱ्या ट्रेनिंगसाठी वय मर्यादा 25 वर्षाच्या आत. (काळा चौकी)/ (कल्याण) संपर्क **9870618006** {NC243518}

लोअर परेल येथे प्युन कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क **7021758817/ 9137457983** {NC243521}

नेपियन्सी रोड येथे लेडीज पार्लरसाठी लेडीज रिसेप्शनिस्ट हवी आहे, १०वी, १२वी अनुभवाची अट नाही **7977799201** {NC243554}

प्रिंटींग प्रेसमध्ये हेडलबर्ग मशिनसाठी प्रिंटर, बॉयलर पाहिजेत. संपर्कः क्रियेटिव्ह आर्ट, युनिट-४१, ओल्ड रामगोपाळ इंडस्ट्रीयल इस्टेट, जवाहर टॉकीजसमोर डॉ. आरपी रोड, मुलुंड (पश्चिम) **9222806020/ 8976167616.** वेळ- 3.00-6.00 {NC243550}

मालाड पश्चिममध्ये ऑफसेट प्रिंटिंगसाठी अनुभवी प्रिंटर, फिडरमन, बॉयलर आणि सुपरवायझर पाहिजेत. **7076767979** {NC243551}

टेलीमार्केटिंगसाठी मुली पगार 15000/-- 17000/- आणि पेमेंट कलेक्शनकरिता मुले/मुली पगार 15000/- -20,000/- त्वरित पाहिजेत. संपर्क- 101, C-28, सेक्टर 11, शांतीनगर, अलोकानंद सोसायटी, टीएमटी बसडेपोच्या मागे, मीरारोड पूर्व. **9987413065** {NC243562}

सिंधुदुर्ग मालवण येथे अनुभवी हॉटेल रिसेप्शनिस्ट, मॅनेजर, रूम बॉय, आचारी पाहिजे, राहण्याची, जेवणाची सोय, - **9423954861** {NC243611}

बोरीवलीमध्ये डिलीव्हरी बॉय/ ऑफीस असिस्टंट कॉम्प्युटर नॉलेज जरुरी. DTDC COURIER **9820505460/ 9324313516** {NC243540}

## पाहिजेत

इलेक्ट्रिक कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार 12000/- -21,000/- गाडीभाडे मिळेल. **8108151170/ 8928562608** {NC243590}

गोरेगाव (वेस्ट) स्क्रीन प्रिंटिंग कंपनीमध्ये स्क्रीन प्रिंटर आणि हेल्पर त्वरित पाहिजेत. : **9833686138** {NC243546}

महाराष्ट्रीयन हॉटेलसाठी मोरी, मंडी, तळणीवर, हेल्पर पाहिजे. गोडवा बोरीवली **8850458566, 9821686058** {NC243403}

दादर, P Square Pest Control मध्ये मुले/मुली पाहिजेत. **9820548338/ 9167952766** {NC243410}

हेल्पर आणि पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. **9819177248, 9820911021, 9821180906** {NC240098}

मालाड-गारमेन्ट फॅक्टरीत Dispatch आणि Computer Billing कामासाठी फिमेल स्टाफ पाहिजेत. पगार 10,000/- ते 15,000/-. संपर्क- **9820596155.** {NC243593}

प्रिंटिंग प्रेससाठी कटिंग मशीन ऑपरेटर/ बाईंडर/ पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. कलर पॅक्स प्रायव्हेट लिमीटेड RTO ऑफीससमोर, घोडबंदर, मीराभाईंदर (पूर्व) **9321598918** {NC243595}

भांडुपयेथे प्रिंटिंग प्रेससाठी हेल्पर्स मुले- मुली आणि Computer चे ज्ञान असणारी मुलगी पहिजेत. Biodata WhatsApp: **9137590722.** {NC243596}

कांदिवली वेस्टला म्युच्युअलफंड, विमा व्यवसायाच्या, बिजनेस डेव्हलोपमेंटसाठी अनुभवी फिल्डवर्क कामासाठी सेल्समेन पाहिजे. अभय- **9223481847** {NC243597}

बँक व्हेरिफिकेशन एजन्सीला फिल्ड कामासाठी मुले पाहिजेत. ठाणे, मुंबई, नवीमुंबईसाठी. पगार फुलटाईम 10,000-12,000. प्रिसाईस सर्विसेस. **9769108450/ 8369564939** {NC243599}

मिरा-भाईंदरमध्ये ऑफिससाठी बाहेरील कामे करायला महिला स्टाफ पाहिजेत. आकर्षक पगार+ कमिशन. संपर्कः **9022271499** {NC243600}

दहिसर वेस्ट येथील ऑफीसमध्ये डिलीव्हरी, ऑफीस कामासाठी, हुशार २०-४० वर्षाचा, ॲक्टीवा चालवू शकणारा ऑफीसबॉय पाहिजे. **9819509040/ 9819881030** {NC243601}

पेस्ट कंट्रोलच्या कामासाठी अनुभवी ऑपरेटर पाहिजे. (डोंबिवली ब्रान्चसाठी) संपर्क- **9769654436** {NC243602}

## पाहिजेत

१२/२४ तास घरकामासाठी/ मुलं सांभाळण्यासाठी बायका/मुली पाहिजेत. **8689987333** {NC243603}

कामासाठी मुली- महिला पाहिजे रोज पगार ८०० - १००० संपर्क - **9503825377** {NC243588}

वडाळा स्टेशनजवळ इलेक्ट्रॉनिक दुकानात काम करण्यासाठी मुलगा/मुलगी पाहिजे, संपर्क **9619697237** {NC243591}

भुलेश्वर, मुंबईयेथील खाजगी लिमिटेड कंपनीसाठी अकाऊंटंट हवा आहे. कार्यालयीन वेळः 11:30 सकाळ ते 9:00 रात्री. संपर्कः **8879977422.** {NC243592}

बोरीवली (वेस्ट) चिकुवाडीत इमीटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुली/ स्त्रिया पाहिजेत. **9821658295** {NC243605}

वसईमध्ये अकाऊंटसच्या कामासाठी हुशार अनुभवी TALLY अकाउन्टंट फिमेल पाहिजेत. **9322936693** {NC243606}

पेस्टकंट्रोलच्या कामासाठी अनुभवी मुले त्वरित पाहिजे. संपर्कः (कांदिवली) **9220789533** {NC243607}

दहिसर (इस्ट) हॉस्पिटलमध्ये अनुभवी स्टाफ पाहिजेत. रिसेप्शन, बिलींग, नर्स, RMO, वॉर्डबॉय आणि सिनीयर अकाऊटंट. संपर्कः **9326988045** {NC243608}

कांदिवली चारकोपमध्ये अनुभवी स्क्रीन प्रिन्टर आणि हेल्पर पाहिजेत. संपर्कः **9324955291** {NC243609}

पाहिजेत अनुभवी सेल्समेन, मास्टर आणि हेल्पर, मालाड आणि बोरिवलीच्या रेडिमेड गारमेंट शोरूम मध्ये कामासाठी. भेटा : शॉप-१, लँडमार्क बिल्डिंग स्टेशन जवळ, बोरिवली (वेस्ट)- **9702272736** वेळ : ११ ते ४ सोमवार ते शुक्रवार){NC243610}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग करण्यासाठी मुली पाहिजे. घरी पण काम देणार. दहिसर पूर्व. Contact: **8169999128** {NC243612}

दादर पूर्व येथील कॉम्प्युटर क्लासेससाठी ४ मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह पाहिजेत. संपर्क- **9920486647/ 9820200638** {NC243613}

वसई स्टेशनजवळ फिटर आणि वेल्डर पाहिजेत. पगार 20 ते 25000, संपर्क **9619817973/ 9765812308** {NC243614}

ड्रायव्हर पाहिजेत. अंधेरी (ईस्ट), घाटकोपर (वेस्ट), परेल या ठिकाणी कंपनीच्या ऑफीससाठी वेतन 25000/- संपर्क **8652471232** {NC243619}

## पाहिजेत

चर्चगेट रेल्वे ऑफिसः पार्टटाइम 7- 10 पगार 3500/, फुलटाईम 7 ते 4-11000/- सुपरवायझर 7 ते 9- 3000/- आणि संध्याकाळी 4 ते 5 - 3000/-: **9869781781** {NC243616}

प्रिंटिंग प्रेसमध्ये ४ कलर कॉमोरी ऑटो प्लेट मशिन प्रिंटर, पंचिंग ऑपरेटर, बॉयलर, २ कलर मशिन UV, ड्रिप ऑफसाठी प्रिंटर, हेल्पर, DTP ऑपरेटर पाहिजेत. पत्ताः गाला ४८, ओल्ड, रामगोपाल ईन्डस्ट्री, जव्हार टॉकीजजवळ, मुलुंड (वेस्ट), मोबाईलः **8369903933, 9920417031.** {NC243615}

घरबसल्या काम पार्टटाईमसाठी टेलीकॉलिंग, WhatsApp साठी मुलगी पाहिजे, Santacruz **9821345555.** {NC243617}

## Situation Vacant

Required BSC Agriculture/ Horticulture Candidate at Panvel **7039028851/ 9022059889** {NC243556}

Free Homoeopathy pharmacy diploma course worli age 18 to 30-- **7738226352** {NC243548}

FAIRTECH SYSTEMS. Jogeshwari west, Requires Tally Operators, Field Sales Persons, **9821828266** {NC243449}

REQUIRED 12TH PASSED FEMALE FOR BILLING & ACCOUNTING WORK WITH COMPUTER KNOWLEDGE AT RAHANAL VILLAGE, BHIWANDI THANE. AGE- 26-35 YEARS LANGUAGE KNOWN- HINDI, MARATHI. SALARY- 10,000/-- 12,000/- TIMING:- 9.00 -6.00 SEND RESUME: impress.label@gmail.com **9158648434** {NC243497}

Male/ Female Telecaller (Fresher's/ Experience) Salary 8000/- to 30000/- Call:- **9136409131**{NC243463}

## व्यवसायविषयक

महिला/मुलींना महिन्याला 30000 रुपये कमवून देणारा ज्वेलरी बिजनेस **7738657263** {NC243283}

**इमीटेशन ज्वेलरीमध्ये लेबर जॉब- स्टोन चिपकवणारे कंपनीवाले संपर्क- 9819159279/ 9819567983 {NC243574}**

यशस्वी उद्योजक बना. दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9967437950** विरार- **8652643434** {NC243407}

## व्यवसायविषयक

नॉयलोन-रबर-स्टॅम्प बनवून मिळतील. तसेच स्टॅम्पची मशिनरी, रॉ-मटेरिअल मिळेल. Mob.- **9819173517** {NC243459}

## कर्जविषयक

१-२ लाख पर्सनल लोन पाच दिवसात तसेच त्याहून अधिक ५० लाख पर्यंत लोन मिळेल. **8591923033** {NC243537}

## For Sale

Residential Furniture and Fixtures at Kandivali in very Good Condition for Sale. Contact: **9324350669** {NC243589}

## विकणे आहे

फिश बोट विकणे आहे किंवा इन्व्हेस्टर पाहिजे. संपर्क- **9004351097** {NC243604}

## गुंतवणूकविषयक

गुंतवणुक (लघुउपयोग (गारमेंट) मध्ये गुंतवणुक करून दरमहा १ लाख नफा कमवा Offer- for limited period **9892073272** {NC243618}

## वर पाहिजे

सुंदर वधु वय 29, उंची 5.3, शिक्षण 12वी, कपड्यांच्या दुकानात कामाला, वेतन- 12,000/-. मुलीला वडील नाहीत. अपेक्षा- निर्व्यसनी, समजुतदार, कष्टाळू **8446389460.** {NC243594}

## विवाहविषयक

घटस्फोटीत हिंदू वर, कोकणस्थ माळी, श्रीवर्धन येथे स्थायिक, ३९, सावळा, 5" O', 10 वी पास, खाजगी नोकरी, अपेक्षा- कोकणस्थ माळी, मराठा, कुणबी, भंडारी, सुतार समाज चालेल, प्रथम वधू, घटस्फोटीत, विधवा चालेल, शिक्षण, नोकरीची अपेक्षा नाही. लग्न सोहळा मुंबई - **9930133735** {NC243570}

**CHANGE OF NAME**

I, **NILAM RATHOD** D/O **YUVRAJ SINGH RATHOD** Residing at Jail Road, Shiv Parvati, Infront of Ig Bunglow, Amravati Camp, Maharashtra-444602, Changed My Name to **NEELAM SINGH RATHORE** for All Future Purposes as per affidavit dtd. 03/12/ 2024

**Nilam Rathod**
D/O **Yuvraj Singh Rathod**
(Signature by old name)



# आजचे राशी भविष्य

शनिवार, दि. ७ डिसेंबर २०२४

ज्योतिषपंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | केलेल्या कामाचे चीज होईल. नैराश्य झटका. भागिदारीतून लाभ. |
| वृषभ | स्वकष्टाने, पराक्रमाने अधिकार मिळवाल. कोणावर विश्वास ठेवू नका. |
| मिथुन | आरोग्य सांभाळा. गरज पडल्यास औषधोपचार घ्या. नोकरीत फायदेशीर गोष्टी घडतील. |
| कर्क | अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल. आत्मविश्वासाच्या बळावर पुढे जाल. |
| सिंह | घरासाठी खर्च कराल. आरोग्याच्या तक्रारींकडे लक्ष द्या. संयम ठेवा. |
| कन्या | कामानिमित्त प्रवास होतील. बुद्धीमत्तेच्या जोरावर शत्रूंवर मात कराल. |
| तूळ | शैक्षणिक क्षेत्रात काम करण्यास चांगला. मन निराश, अस्थिर होऊ देऊ नका, तरच ठरवलेली कामे होतील. |
| वृश्चिक | रागावर नियंत्रण ठेवा. संयमाने कृती करा. ठरवलेल्या गोष्टी पार पाडाल. |
| धनु | आरोग्यासंबंधी तक्रारींकडे लक्ष दणे गरजेचे आहे. नवनिर्मितीच्या कल्पना मनात येतील. |
| मकर | जोडीदारासंबंधी काळजी वाटेल. स्वतः भक्कम स्थितीत असल्याने प्रश्न सुटू शकतात. |
| कुंभ | शत्रू ताब्यात राहतील. नोकरदारांना संधी मिळाल्यास उपयोगी ठरतील. |
| मीन | मनाला बंधन घालणे गरजेचे राहील. संयमी वृत्ती ठेवा. झटपट पैशाच्या मागे लागू नका. |

**शुभ राशी दि. ०७/१२/२०२४**

| | | |
|---|---|---|
| ८ | ४ | ९ |
| ८१ | ४१ | ९१ |
| ८६ | ४६ | ९६ |
| १२५ | ३५६ | ३७९ |
| ३७८ | १५८ | ४५० |

## निकाल — गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 5:00

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 49 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 06/12/2024

पहिले बक्षिस रु. 10000/- — **MG-09 : 6601**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **1030** — महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी

तिसरे बक्षिस रु. 1000/- — **2022** (कोमल एजन्सी, औरंगाबाद), **3675** (अंबिका एजन्सी - दादर, मुंबई), **6541**, **7726**, **8405**

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 400/- | 1719 | 3036 | 4040 | 4845 | 5488 | 6442 | 7377 | 8081 |
| 1012 | 1860 | 3073 | 4166 | 4879 | 5616 | 6669 | 7387 | 8110 |
| 1101 | 2011 | 3231 | 4384 | 5058 | 5885 | 6684 | 7510 | 8141 |
| 1110 | 2617 | 3374 | 4406 | 5106 | 5966 | 6735 | 7749 | 8344 |
| 1114 | 2627 | 3550 | 4426 | 5205 | 6036 | 6915 | 7758 | 8496 |
| 1132 | 2628 | 3601 | 4747 | 5259 | 6062 | 6961 | 7809 | 8612 |
| 1151 | 2767 | 3755 | 4791 | 5266 | 6305 | 7117 | 7870 | 8636 |
| 1501 | 2812 | 3837 | 4799 | 5304 | 6306 | 7231 | 7875 | 8687 |
| 1516 | 3004 | 4014 | 4844 | 5455 | 6361 | 7283 | 7975 | 8848 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री • राजलक्ष्मी विकली लॉटरी •

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 49 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 06/12/2024

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SR-08 : 5880** — श्री एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **1079**

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **3888** (किशोर लॉटरी सेंटर, सांगली), **4938** (रुखमणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद), **5081** (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई)

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1141 | 1819 | 3353 | 4147 | 5258 |
| 1269 | 1936 | 3369 | 4349 | 5412 |
| 1339 | 2354 | 3616 | 4440 | 5552 |
| 1413 | 2371 | 3687 | 4511 | 5564 |
| 1514 | 2492 | 3719 | 4553 | 5687 |
| 1760 | 2749 | 3773 | 4586 | 5702 |
| 1770 | 2928 | 4047 | 4594 | 5865 |
| 1817 | 3202 | 4077 | 4919 | 5900 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र वैभवलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शुक्रवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 49 • सोडत दिनांक 06/12/2024

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **VL-04 : 4798**

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी — **4798** — बारड लॉटरी सेंटर - सोलापूर; चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1411 | 2485 | 2577 | 3493 | 5555 | 5765 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1519 | 1588 | 2463 | 4458 | 4832 | 6060 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 3079 | 3324 | 3395 | 4982 | 5543 | 5997 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 2459 | 3145 | 4392 | 5037 | 5198 | 6613 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1725 | 2200 | 2567 | 2982 | 3396 | 3983 | 4440 | 4772 | 5264 | 5726 | 6152 | 6606 |
| | | 1736 | 2206 | 2572 | 3003 | 3403 | 3986 | 4447 | 4776 | 5267 | 5730 | 6169 | 6608 |
| 1001 | 1218 | 1763 | 2215 | 2602 | 3007 | 3405 | 4024 | 4451 | 4783 | 5302 | 5742 | 6182 | 6609 |
| 1004 | 1262 | 1781 | 2229 | 2608 | 3030 | 3445 | 4044 | 4453 | 4794 | 5318 | 5751 | 6189 | 6617 |
| 1009 | 1269 | 1793 | 2230 | 2661 | 3032 | 3495 | 4074 | 4454 | 4799 | 5325 | 5755 | 6198 | 6620 |
| 1017 | 1271 | 1810 | 2235 | 2663 | 3033 | 3506 | 4084 | 4462 | 4816 | 5327 | 5775 | 6211 | 6622 |
| 1030 | 1292 | 1813 | 2256 | 2688 | 3034 | 3512 | 4099 | 4466 | 4837 | 5331 | 5778 | 6214 | 6626 |
| 1038 | 1294 | 1821 | 2261 | 2689 | 3039 | 3525 | 4100 | 4477 | 4840 | 5351 | 5789 | 6216 | 6656 |
| 1052 | 1306 | 1844 | 2262 | 2696 | 3067 | 3532 | 4121 | 4478 | 4879 | 5385 | 5805 | 6220 | 6661 |
| 1058 | 1310 | 1858 | 2267 | 2719 | 3073 | 3533 | 4125 | 4484 | 4880 | 5386 | 5849 | 6226 | 6666 |
| 1078 | 1313 | 1867 | 2268 | 2723 | 3099 | 3534 | 4141 | 4485 | 4903 | 5420 | 5853 | 6236 | 6669 |
| 1090 | 1321 | 1871 | 2274 | 2724 | 3103 | 3568 | 4148 | 4495 | 4907 | 5424 | 5855 | 6241 | 6670 |
| 1100 | 1361 | 1885 | 2279 | 2729 | 3104 | 3584 | 4153 | 4496 | 4943 | 5447 | 5856 | 6255 | 6673 |
| 1109 | 1365 | 1932 | 2280 | 2746 | 3111 | 3588 | 4156 | 4502 | 4944 | 5458 | 5875 | 6256 | 6690 |
| 1111 | 1376 | 1937 | 2281 | 2749 | 3118 | 3618 | 4159 | 4504 | 4947 | 5468 | 5876 | 6261 | 6696 |
| 1124 | 1377 | 1938 | 2292 | 2757 | 3181 | 3663 | 4167 | 4505 | 4983 | 5478 | 5929 | 6263 | 6706 |
| 1131 | 1391 | 1941 | 2293 | 2758 | 3189 | 3665 | 4171 | 4521 | 4987 | 5480 | 5953 | 6266 | 6718 |
| 1135 | 1401 | 1950 | 2294 | 2764 | 3196 | 3679 | 4174 | 4533 | 5018 | 5493 | 5955 | 6296 | 6721 |
| 1141 | 1404 | 1983 | 2300 | 2770 | 3200 | 3688 | 4194 | 4541 | 5033 | 5500 | 5971 | 6298 | 6742 |
| 1144 | 1434 | 1987 | 2302 | 2771 | 3230 | 3710 | 4204 | 4544 | 5039 | 5511 | 5983 | 6306 | 6745 |
| 1145 | 1435 | 1989 | 2329 | 2772 | 3236 | 3717 | 4218 | 4549 | 5049 | 5516 | 5988 | 6323 | 6755 |
| 1148 | 1448 | 1991 | 2340 | 2780 | 3248 | 3729 | 4230 | 4554 | 5054 | 5522 | 6004 | 6351 | 6762 |
| 1149 | 1451 | 2010 | 2365 | 2792 | 3250 | 3732 | 4278 | 4589 | 5057 | 5532 | 6027 | 6362 | 6763 |
| 1150 | 1487 | 2012 | 2368 | 2798 | 3258 | 3737 | 4294 | 4608 | 5059 | 5549 | 6055 | 6382 | 6767 |
| 1163 | 1505 | 2016 | 2373 | 2806 | 3277 | 3739 | 4297 | 4633 | 5062 | 5550 | 6056 | 6386 | 6796 |
| 1167 | 1513 | 2018 | 2375 | 2824 | 3290 | 3742 | 4299 | 4636 | 5068 | 5568 | 6065 | 6394 | 6862 |
| 1168 | 1589 | 2021 | 2392 | 2826 | 3300 | 3761 | 4314 | 4644 | 5073 | 5578 | 6068 | 6412 | 6873 |
| 1175 | 1591 | 2046 | 2420 | 2858 | 3322 | 3778 | 4359 | 4654 | 5074 | 5589 | 6069 | 6413 | 6886 |
| 1176 | 1604 | 2114 | 2424 | 2873 | 3329 | 3833 | 4369 | 4668 | 5075 | 5590 | 6070 | 6438 | 6892 |
| 1179 | 1605 | 2117 | 2428 | 2876 | 3331 | 3835 | 4372 | 4682 | 5085 | 5593 | 6086 | 6462 | 6962 |
| 1180 | 1645 | 2122 | 2436 | 2892 | 3349 | 3863 | 4379 | 4683 | 5124 | 5594 | 6087 | 6488 | 6967 |
| 1181 | 1661 | 2154 | 2438 | 2925 | 3352 | 3881 | 4396 | 4712 | 5177 | 5598 | 6092 | 6536 | 6968 |
| 1189 | 1669 | 2159 | 2513 | 2951 | 3377 | 3933 | 4414 | 4731 | 5200 | 5599 | 6098 | 6560 | 6969 |
| 1196 | 1681 | 2169 | 2521 | 2959 | 3379 | 3946 | 4421 | 4739 | 5230 | 5608 | 6101 | 6566 | 6979 |
| 1200 | 1716 | 2174 | 2549 | 2962 | 3381 | 3949 | 4425 | 4745 | 5237 | 5648 | 6114 | 6569 | 6986 |
| 1216 | 1717 | 2180 | 2557 | 2968 | 3393 | 3973 | 4427 | 4769 | 5247 | 5711 | 6117 | 6583 | 6995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 49 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 06/12/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 5652 | 0083 | 8651 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 3437 | 3392 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5489 | | | | | 7107 | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0549 | | 2875 | | 2946 | | 3820 | | 5828 | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0966 | 1328 | 1400 | 2649 | 3222 | 3396 | 6028 | 6738 | 8239 | 9098 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0498 | 1965 | 5383 | 6085 | 6445 | 6566 | 7026 | 7235 | 7441 | 9680 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 300/- | 0781 | 1852 | 2912 | 3783 | 5035 | 6098 | 6776 | 7738 | 8719 | 9559 |
| | 0835 | 1865 | 2935 | 3858 | 5045 | 6121 | 6961 | 7753 | 8867 | 9568 |
| 0025 | 0854 | 1873 | 3013 | 3877 | 5414 | 6158 | 6996 | 7767 | 8876 | 9609 |
| 0043 | 0916 | 1899 | 3027 | 4049 | 5552 | 6220 | 7047 | 7947 | 8934 | 9630 |
| 0055 | 0950 | 1998 | 3113 | 4105 | 5559 | 6265 | 7076 | 7967 | 8938 | 9638 |
| 0168 | 1085 | 2027 | 3282 | 4144 | 5583 | 6302 | 7087 | 7968 | 8955 | 9659 |
| 0179 | 1117 | 2202 | 3289 | 4200 | 5597 | 6366 | 7107 | 8088 | 8998 | 9690 |
| 0200 | 1121 | 2224 | 3293 | 4260 | 5651 | 6386 | 7121 | 8095 | 9089 | 9769 |
| 0201 | 1138 | 2230 | 3299 | 4404 | 5658 | 6397 | 7167 | 8098 | 9231 | 9845 |
| 0208 | 1140 | 2238 | 3327 | 4437 | 5698 | 6509 | 7236 | 8198 | 9233 | 9858 |
| 0243 | 1155 | 2261 | 3335 | 4484 | 5740 | 6531 | 7410 | 8247 | 9296 | 9874 |
| 0315 | 1208 | 2290 | 3362 | 4487 | 5763 | 6596 | 7443 | 8264 | 9321 | 9889 |
| 0423 | 1214 | 2536 | 3367 | 4505 | 5772 | 6604 | 7529 | 8287 | 9351 | 9919 |
| 0430 | 1358 | 2599 | 3375 | 4658 | 5791 | 6606 | 7555 | 8332 | 9377 | 9928 |
| 0480 | 1389 | 2632 | 3377 | 4814 | 5882 | 6623 | 7643 | 8374 | 9395 | 9934 |
| 0544 | 1508 | 2640 | 3495 | 4854 | 5885 | 6627 | 7668 | 8384 | 9419 | 9970 |
| 0577 | 1513 | 2692 | 3553 | 4912 | 5906 | 6649 | 7685 | 8494 | 9458 | 9976 |
| 0710 | 1702 | 2837 | 3575 | 4961 | 5986 | 6681 | 7697 | 8696 | 9518 | 9981 |
| 0730 | 1707 | 2899 | 3645 | 5034 | 6042 | 6690 | 7715 | 8702 | 9542 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# जिल्हा परिषदेच्या पोषण आहारातून गडचिरोलीत ८० विद्यार्थ्यांना विषबाधा

■ गडचिरोली

**गडचिरोलीतील** पारडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये पोषण आहारातून ८० विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची घटना घडली. विद्यार्थ्यांना खायला दिलेल्या चण्यातून ही विषबाधा झाली. त्यांना उलट्या, ताप आणि अतिसार त्रास होऊ लागला. प्रकृती बिघडल्याने विद्यार्थ्यांना तत्काळ रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. सध्या विद्यार्थ्यांवर सावली ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे.

सावली येथे तत्काळ आरोग्यसेवा उपलब्ध करून विद्यार्थ्यांवर उपचार करण्यात येत असले तरी या रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने उपचार करण्यास अडचण येत आहे.

जागेअभावी २५ विद्यार्थ्यांना मूल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांनी संताप व्यक्त केला. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याची मागणी पालकांनी केली.

# ८ डिसेंबरपासून सैलूत केशवराज महाराजांच्या यात्रेला सुरुवात

■ परभणी

**सेलू** शहराचे ग्रामदैवत असलेल्या केशवराज बाबासाहेब महाराजांचा यात्रा महोत्सव ८ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. ८ ते १६ डिसेंबर या कालावधीत मोठ्या उत्साहात साजर्या होणार्या यात्रा महोत्सवात दररोज श्रीच्या मूर्तीस लघुरुद्र व पवमान अभिषेक, अखंड हरिनाम सप्ताह, श्री गुरुचरित्र पारायण, हरिपाठ, महिला मंडळाचे भजन, कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नादविहार संगीत परिवार सेलू यांच्या वतीने अखंड विष्णुसहस्त्रनाम सप्ताह तसेच विवेक वसंत मंडलिक व गोविंद वसंत मंडलिक यांचे शुक्ल यजुर्वेद संहिता पारायण तर वेशास सारंग रामचंद्र सराफ व वेशास ओंकार नर्सिकर यांचे ऋग्वेद शाकल संहिता पारायण होणार आहेत. ८ ते १४ डिसेंबर या कालावधीत भागवताचार्य नंदकिशोर महाराज गोंदीकर यांच्या श्रीमद भागवत कथेचे निरूपण ११ ते ४ या वेळेत होणार आहे.

दररोज रात्री ९ वाजता हभप बालासाहेब महाराज नेब (समर्थ जांब) यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. ११ डिसेंबर रोजी केशवराज बाबासाहेब महाराजांची पुण्यतिथी असल्यामुळे सकाळी ७ ते ९ या वेळेत केशवराज बाबासाहेब महाराजांच्या ओवीबद्ध चरित्राचे सामूहिक ३ पाठ होणार आहेत. ९ वाजता श्रीमद भगवत गीतेचे संपूर्ण १८ अध्याय पठन व सायंकाळी श्रींची आराधना, अभिषेक व महापूजा होणार आहे.

# बसपाचे नेते सुरेंद्र सागर यांना मायावतींनी पक्षातून निलंबित केले

■ लखनऊ

**आपल्या** मुलीचे समाजवादी पार्टीचे आमदार त्रिभुवन दत्त यांच्या मुलाशी लग्न लावून देणारे बहुजन समाज पार्टीचे नेते सुरेंद्र सागर यांना पक्षप्रमुख मायावती यांनी पक्षातून निलंबित केले आहे.

त्रिभुवन दत्त यांची मुलगी कुसुम हिचा विवाह सपाचे आमदार सुरेंद्र कुमार यांचा मुलगा अंकुर सागर याच्याशी २७ नोव्हेंबर रोजी झाला. या लग्नाला समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादवही उपस्थित होते. या लग्नाच्या स्वागत समारंभाचे फोटो व्हायरल झाले. ही बाब बसपा प्रमुख मायावती यांना कळल्यानंतर त्यांनी सुरेंद्र दत्त यांना पक्षातून निलंबित केले. या लग्नाला बसपाच्या कोणीही नेत्याने



जाऊ नये असे फर्मानही त्यांनी या आधी काढले होते. सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून एकेकाळी उत्तर प्रदेशाची सत्ता मिळवणाऱ्या मायावती यांच्या या निर्णयावर आश्चर्य व्यक्त केले आहे.


# पासपोर्ट सेवा केंद्राची आता संख्या वाढणार

**नवी दिल्ली- टपाल** कार्यालयांमधून पासपोर्ट सेवा देणाऱ्या केंद्रांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.सध्या देशभरातील ४४२ टपाल कार्यालयांमध्ये पासपोर्ट सेवा केंद्र सुरू आहेत. ही संख्या येत्या पाच वर्षांत वाढवून सहाशेपर्यंत नेण्यात येणार आहे. केंद्र सरकारने एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली. २०१७ मध्ये केंद्र सरकारने पोस्ट ऑफीस पासपोर्ट सेवा केंद्र या नावाने ही योजना देशात पहिल्यांदाच सुरू केली. आपल्या घरापासून जवळच्या टपाल कार्यालयामध्ये पासपोर्ट सेवा मिळत असल्याने आजवर या सेवेचा १ कोटी ५२ लाख लोकांनी लाभ घेतला आहे.

देश विदेश

# कॅलिफोर्नियात भूकंपाचे धक्के

■ वॉशिंग्टन



**अमेरिकेतील** कॅलिफोर्नियातील फर्न्डेल भागात काल ७ रिश्टर स्केलचे भूकंपांचे धक्के जाणवले. या भूकंपाचे केंद्र जमिनीखाली १० किलोमीटर असल्याची माहिती अमेरिकेच्या भूविज्ञान संस्थेने सांगितले. हा धक्का इतका जोरदार होता की परिसरातील इमारती हादरल्या. भूकंपानंतर राज्यात त्सुनामीचाही इशारा देण्यात आला आहे. कॅलिफोर्निया राज्यातील फर्न्डेल भाग हा रेडवुडची जंगले, सुंदर पर्वत आणि थ्री-काउंटी एमराल्ड ट्रँगल तसेच प्रसिद्ध मारिजुआना दृश्यासाठी ओळखले जाते. दोन वर्षांपूर्वीही या भागाला ६.४ रिश्टर क्षमतेचे धक्के बसले होते. भूकंपामुळे येणाऱ्या त्सुनामीमुळे किनारपट्टीवरील साडेपाचलाख लोकांना किनाऱ्यापासून दूर जाण्याचा इशारा देण्यात आला.

# बांगलादेशातील नोटांवरून शेख मुजीबूर रेहमान यांचे नाव हटवणार

■ ढाका

**बंगलादेशातील** शेख हसीना यांचे सरकार उलथवून टाकल्यानंतर आता बांगला देशाचे राष्ट्रपिता अशी ओळख असलेले बांगला मुक्ती संग्रामाचे नेते आणि माजी पंतप्रधान शेख मुजीबूर रेहमान यांचा बांगलादेशातील नोटांवरून फोटो हटवला जाणार आहे.त्या ऐवजी नोटांवर शेख हसीना यांच्या विरोधातील आंदोलन तसेच बांगला संस्कृतीची ओळख असलेली काही चित्रे छापली जाणार आहेत. बांगला देशातील बँकांनी हा निर्णय घेतल्याचे समजते.

आरक्षणाच्या मुद्द्यावरून शेख हसीना यांच्या विरुद्ध जे सूर हिंसक आंदोलन झाले होते. त्यावेळी कट्टर पंथीयांनी मुजीबूर रेहमान यांचा पुतळा तोडला होता. त्याच आंदोलनातून शेख हसीना आणि त्यांचे वडील मुजीबूर रेहमान यांच्या विरुद्ध विद्वेषाची भावना पसरवण्यात आली.

# पीलीभीत चित्रकूटमध्ये अपघातात १० जणांचा मृत्यू

■ उत्तर प्रदेश

**उत्तर** प्रदेशात काल रात्री झालेल्या दोन भीषण अपघातात १० जणांचा मृत्यू झाला. पीलीभीत येथे भरधाव कारचे नियंत्रण सुटून कार झाडावर धडकून अपघात झाला. विवाह सोहळ्यातून वधू पक्षाचे लोक कारमधून घरी परतत होते. या अपघातात झाड तुटून कारवर पडल्याने वधूचे वडील मंजूर अहमद यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाला. तर ५ जण गंभीर जखमी झाले. तर चित्रकूटमध्ये प्रयागराजकडून एकाच कुटुंबातील लोकांना घेऊन येणारी बोलेरो समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जेसीबी मशिनच्या साहाय्याने झाड हटवले आणि गाडीतील लोकांना बाहेर काढले.

# भाजपाचे नेते सुरेंद्र पाल बिट्टू आपमध्ये

■ नवी दिल्ली

**दिल्ली** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षात इनकमिंग सुरु आहे.त्यात आज भाजपाचे नेते सुरेंद्र पाल सिंह बिट्टू यांनी आपचे नेते मनीष सिसोदिया यांच्या उपस्थितीत आपमध्ये प्रवेश केला.बिट्टू हे तिमारपूरचे काँग्रेसचे आमदार होते. त्यांना आपकडून तिमारपूरमधून तिकीट मिळण्याची शक्यता आहे.

पक्षात प्रवेश केल्यानंतर सुरेंद्र पाल बिट्टू म्हणाले की,आम आदमी पक्ष गरिबांच्या वेदना समजून घेणारा पक्ष आहे. लहान-मोठे सर्वांचे दुःख ऐकणारे अरविंद केजरीवाल यांच्या खांद्याला खांदा लावून आम्ही दिल्लीला पुढे नेणार आहोत.

मनीष सिसोदिया म्हणाले की,मी सुरेंद्र पाल सिंह बिट्टू यांचे आम आदमी पक्षात स्वागत करतो.अरविंद केजरीवाल यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्यांनी आम आदमी पक्षात येण्याचा निर्णय घेतल्याचा मला आनंद आहे. कारण आम आदमी पार्टी हा एकमेव पक्ष आहे, जो फक्त गरिबांसाठी काम करतो.बिट्टू दोन वेळा आमदार आणि महापालिकेचे नगरसेवक राहिले आहेत. त्यांच्या राजकीय अनुभवाचा पक्षाला फायदा होईल.

# सीईओ ब्रायन थॉम्पसन यांची गोळ्या घालून हत्या

■ न्यूयॉर्क

**अमेरिकेत** युनायटेड हेल्थकेअरचे सीईओ ब्रायन थॉम्पसन यांची भर रस्त्यात गोळी घालून हत्या करण्यात आली आहे. मॅनहॅटनमधील हिल्टन हॉटेलच्या बाहेर मास्क परिधान केलेल्या एका मारेकऱ्याने त्यांची हत्या केली आहे. ब्रायन ५० यांच्या छातीत गोळी लागल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं. पण त्याठिकाणी तपासल्यानंतर डॉक्टरांनी थॉम्पसन यांना मृत घोषित केलं. थॉम्पसन याठिकाणी कंपनीच्या इनव्हेस्टर डे कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी त्यांच्यावर हा हल्ला झाला.

# लोकसंख्या वाढीसाठी अनोखा प्रयोग चीनच्या कॉलेजात शिकवणार प्रेमशास्त्र

■ बीजिंग

**चीनने** वन चाईल्ड पॉलिसी राबवून लोकसंख्या नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे प्रजनन दर घटला आहे. लोकसंख्या कमी होत चालली आहे. त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. कारण वन चाईल्ड पॉलिसीमुळे लैंगिक संबंधाबद्दल चीनी तरुण- तरुणींच्या मनात नकारात्मक भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे हे बदलण्यासाठी व तरुण तरुणींमध्ये पुन्हा लैंगिक आकर्षण निर्माण करण्यासाठी चीनने कॉलेजात प्रेम शास्त्र हा विषय सक्तीचा करण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते.

जगात लोकसंख्येच्या बाबतीत चीन पहिल्या क्रमांकावर होता. वन चाईल्ड पॉलिसी बाबतचा निर्णय चीनी सरकारच्या चांगलाच अंगलट आला. कारण तरुण - तरुणी मधील लैंगिक आकर्षण कमी होऊ लागले. विवाह संस्थांवरही त्याचा परिणाम झाला. चीनी तरुण तरुणी विवाह किंवा रिलेशन पासून दूर राहू लागले परिणामी प्रजनन दर घटला त्यामुळे आता वन चाईल्ड पॉलिसी रद्द करून कॉलेजात प्रेमशास्त्र तसेच लैंगिक आकर्षण निर्माण करणारे धडे दिले जाणार आहेत.

# विषबाधेच्या दोन घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्ह्यात विषबाधेच्या दोन घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. करवीर तालुक्यातील मांडरे आणि कागल तालुक्यातील चिमगाव येथे विषबाधा झाल्याने दोन चिमुकल्यांसह पाच जणांना आपला जीव गमवावा लागला.



मांडरे येथे २० दिवसांपूर्वी मुंगूस चावून दगावलेल्या कोंबडीचे मांस खाल्ल्याने एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. वडील पांडुरंग विठ्ठल पाटील, कृष्णात पाटील आणि रोहित पाटील या दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.तर लहान भाऊ प्रदीप पाटील याची प्रकृती अत्यवस्थ आहे. कौटुंबिक वादातून पत्नी गंगा हिनेच कुटुंबीयांवर विषप्रयोग केला असावा,असा ग्रामस्थांचा संशय आहे. अजून तरी ठोस पुरावा हाती न आल्याने पोलिसांचा तपास सुरू आहे. मांडरेतील प्रकरण ताजे असतानाच चिमगाव येथे मुदत संपलेला कप केक खाल्लेल्या चिमुकल्या भावंडांचा मृत्यू झाला. एका नातेवाईकाने आणलेल्या कप केकमधून त्यांना ही विषबाधा झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला. पोलिसांनी दफन केलेले मुलांचे मृतदेह बाहेर काढून तपासणीसाठी नमुने पाठवले आहेत. दोघांच्या मृत्यूच्या कारणाचे निदान करण्यासाठी व्हिसरा तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.दोन्ही घटनांची गंभीर दखल घेत दोन्ही घटनांत विषबाधेसाठी कारणीभूत ठरलेले अन्न नेमके कुठून आले होते? त्याचे उत्पादन कुठे झाले होते? याची चौकशी सध्या पोलिसांकडून केली जात आहे.

# मुंबईत घामाच्या धारा धुके आणि उष्मा

■ मुंबई

**यंदा** मुंबईकरांना आठवडाभरही थंडी अनुभवण्यास मिळालेली नाही. फेंगल वादळामुळे हवामानात पुन्हा बदल झाला आहे.

वातावरणात धुके आणि तापमानाचा पारा चढला आहे. त्यामुळे ऐन थंडीत घामाच्या धारा लागल्या आहेत. पुढील काही दिवस मुंबईसह उपनगरांत हिच स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. काल मुंबईचे किमान तापमान २७ तर कमाल तापमान ३७ अंशावर पोहचले होते.

# परभणीतील एकाच कुटुंबातील तिघांच्या आत्महत्येचे गूढ उकलले

■ परभणी

**गंगाखेडमध्ये** एकाच कुटुंबातील तिघांनी रेल्वेखाली आत्महत्या केली होती. या घटनेचे गूढ अखेर उलगडले. मुलीस माझ्यासोबत लग्न कर, अन्यथा तुझ्यासोबतचे असलेले व्हिडिओ आणि फोटो व्हायरल करण्याची धमकी सहन न झाल्यामुळे तिघांनी आत्महत्या केल्याचे चौकशीतून उघड झाले आहे. याप्रकरणी गंगाखेड पोलिसांनी आरोपी तरुणाविरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक केली.

गंगाखेड शहरानजीकच्या धारखेड शिवारातील रेल्वे रुळावर २८ नोव्हेंबरला दुपारी ममता माध्यमिक विद्यालयातील शिक्षक मसनाजी तुडमे, त्यांच्या पत्नी रंजना आणि मुलगी अंजली यांनी आत्महत्या केली होती. या घटनेमुळे गंगाखेड हादरले

**व्हिडिओ आणि फोटो व्हायरल करण्याची धमकी**

होते. आत्महत्या करणारे तुडमे कुटुंब लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील किनी-कद्दू येथील रहिवासी होते.या तिघांच्या आत्महत्येमुळे तुडमे याच्या नातेवाईकांना मोठा धक्का बसला.या तिघांच्या मृतदेहावर एकाच चितेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रकरणी मसनाजी यांचे भाऊ फिर्यादी शिवाजी तुडमे यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या फिर्यादीवरून शिवम नारायण राऊत (२१) या तरुणाविरोधात गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र तपास करताना पोलिसांना आरोपी तरुणाच्या मोबाईल सीडीआरवरून संशय बळावला.

चौकशीसाठी आरोपीस बोलाविले असता आरोपी तरुणाने व्हिडिओ आणि फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे कबुल केले. त्यानंतर काल रात्री गंगाखेड पोलिसांनी आरोपीला अटक केली.

# तिन्ही टॉवर सुरू न केल्यास बीएसएनएल कार्यालय बंद करू

**बांद्यात भाजपचा इशारा**

■ सावंतवाडी

**बांदा** पंचक्रोशीत बीएसएनएलचे दर वाढविले आहेत. त्यातच मोबाईलसाठी तीन टॉवर उभारले, मात्र ते कार्यरत नाहीत. त्यामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी भाजप पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली बांदा बीएसएनएल कार्यालयावर धडक मारली. येत्या १५ जानेवारीपर्यंत हे तिन्ही टॉवर सुरू केले नाही तर कार्यालय उघडू न देण्याचा इशारा दिला. बांदा भाजपचे पदाधिकारी गुरू कल्याणकर, हेमंत दाभोलकर,सागर गावडे, संजय सावंत आणि ग्रामस्थांनी बीएसएनएल अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी सिंधुदुर्ग उपमहाप्रबंधक आर. व्ही. जानू यांनी १५ जानेवारीपर्यंत तिन्ही टॉवर सुरू करण्याचे आश्वासन दिले. मात्र आश्वासन पूर्ण केले नाही तर बीएसएनएल कार्यालयाच्या दारातच आंदोलन करण्याचा आणि प्रसंगी कार्यालय उघडू न देण्याचा इशारा संतप्त ग्रामस्थ आणि भाजप पदाधिकाऱ्यांनी दिला. असनिये, डोंगरपाल आणि घारपी याठिकाणी दीड वर्षांपासून केवळ मोबाईल टॉवर उभे केले आहेत.

# १० डिसेंबरला श्री दत्ताचा रथ राजस्थानातून सारंगखेड्यात

■ नंदुरबार

**शहादा** तालुक्यातील सारंगखेडा येथील ऐतिहासिक दत्त यात्रोत्सव १४ डिसेंबरपासून सुरु होत आहे. या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे. यंदा नवीन रथातून दत्तप्रभूच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. हा आकर्षक नक्षीकाम केलेला रथ राजस्थानातील पाली येथून

मंदिर प्रशासनाने विकत घेतला आहे.हा रथ १० डिसेंबर रोजी मंदिरात दाखल होणार असल्याची माहिती सारंगखेडा येथील एकमुखी दत्त मंदिर ट्रस्टचे सचिव भिकन



पाटील, चेअरमन अंबालाल पाटील, व्हाईस चेअरमन रवींद्र पाटील यांनी दिली.

या नवीन रथासाठी मंदिर प्रशासनाने १७ लाख रुपये खर्च केले आहेत. यात्रेनिमित्त शहादा येथील अग्निशमक दलाच्या बंबाने संपूर्ण मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे. मंदिर पाण्याने धुवून काढले आहे.

**१४ डिसेंबरपासून यात्रा सुरू**

भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर प्रशासनाकडून महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र दर्शन रांगांची व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था, पाणी, स्वच्छतागृह आदी व्यवस्था करण्यात येणार आहे. या यात्रेनिमित्त याठिकाणी घोड्यांचा मोठा बाजार भरत असतो.त्यामुळे या यात्रेला घोड्यांची यात्रा असेही संबोधले जाते.

# मुंबईत पुष्पा चित्रपटाच्या खेळात अज्ञाताने फवारला विषारी स्प्रे

■ मुंबई

**मुंबईच्या** वांद्रे येथील गेईटी, गॅलेक्सी, जेमिनी या चित्रपटगृहांपैकी गेईटीमध्ये काल पुष्पा २ या चित्रपटाचा खेळ हाऊसफुल्ल गर्दीत सुरु होता. त्यावेळी मध्यंतरात एका अज्ञाताने चित्रपटगृहात विषारी स्प्रे फवारला. त्याचा त्रास लोकांना जाणवू लागल्यानंतर दरवाजे उघडण्यात आले. गॅसचा परिणाम ओसरल्यानंतर खेळ पुन्हा सुरु करण्यात आला.

विषारी गॅस फवारल्यानंतर प्रेक्षागृहातील लोकांना अचानक खोकला येऊ लागला व गुदमरायला लागले. काहींना तर उलट्याही झाल्या. हा प्रकार व्यवस्थापनाच्या लक्षात आल्यानंतर चित्रपटाचा खेळ थांबवण्यात आला. त्यानंतर दरवाजे उघडण्यात आले. या विषारी गॅसचा परिणाम १५ मिनिटांनंतर निवळला. त्यानंतर चित्रपटाचा खेळ पुन्हा सुरु करण्यात आला. लोकांनी या घटनेचे व्हिडीओही समाजमाध्यमावर पोस्ट केले आहेत. पोलिसांनी व थिएटरच्या कर्मचाऱ्यांना प्रत्येक प्रेक्षकाची तपासणी केली.

# श्री खंडोबा व म्हाळसादेवीचा हळदी सोहळा! महिलांची गर्दी

**प्रथमच 'घाणा' विधीचे आयोजन**

■ दहिवडी



**माण** तालुक्यातील मलवडी येथील श्री खंडोबाची वार्षिक यात्रा सुरू आहे. त्यानिमित्त श्री खंडोबा व माता म्हाळसादेवीचा हळदी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.त्यासाठी महिलांनी अलोट गर्दी केली होती.

देवदीपावलीच्या शुभमुहूर्तावर रात्री सव्वानऊ वाजता श्री खंडोबा व माता म्हाळसादेवीचा हळदी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.यंदा प्रथमच हळदी सोहळ्यापूर्वी घाणा या विधीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रांगोळी व फुलांच्या सहाय्याने घाणा दळण्यासाठी जाते सजविले होते. पान, विडा आणि बांगड्यांची आरास करण्यात आली होती.सुवासिनींनी मोठ्या भक्ति-भावाने घाणा विधी पार पाडला. त्यानंतर सव्वानऊ वाजता ब्राह्मण व जंगम यांनी सर्व धार्मिक विधी पूर्ण केल्यानंतर विश्वस्त, सालकरी, मानकरी, सेवेकरी, भाविक व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत हळदी सोहळ्यास सुरुवात झाली. या सोहळ्यास मोठ्या प्रमाणात महिलांची उपस्थिती होती.महिलांनी हळदी लावल्यानंतर पुरुषांनी हळदी सोहळ्यात सहभाग घेतला. रात्री ११ वाजेपर्यंत हळदीचा कार्यक्रम सुरू होता.

# प्रसिद्ध तोरणमाळला जाणारी एसटी तब्बल २ महिन्यांपासून बंद

■ नंदुरबार

**राज्यातील** दुसर्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण असलेल्या शहादा तालुक्यातील तोरणमाळ येथे जाणारी राज्य परिवहन महामंडळाची बस दीड महिन्यापासून बंद आहे.परिणामी तोरणमाळसह अतिदुर्गम भागातील सुमारे २२ पाड्यांवरील ग्रामस्थ व पर्यटकांना खाजगी प्रवासी वाहतूक सेवेवर अवलंबून रहावे लागत असून नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

डोंगरदर्यातून सात पायरी घाट ओलांडून अतिदुर्गम भागात हे तोरणमाळ पर्यटन स्थळ आहे. येथील पाड्यांवर हजारो लोक राहतात.एसटी महामंडळाने या लोकांसाठी आणि पर्यटकांसाठी गेल्या काही वर्षांपासून मिनी बस सुरु केल्या होत्या. या बस तोरणमाळ, लेघापाणी येथील विद्यार्थी नागरिकांच्या सोयीच्या होत्या.

# पन्हाळा तालुक्यात उसाच्या वाड्याची खरेदी-विक्री जोमात

■ कोल्हापूर

**सध्या** जिल्ह्यात साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू आहे.त्यासाठी ऊसतोडणीच्या कामाला वेग आला आहे.त्यामुळे उसाचे वाडे विक्री सुरू झाली आहे. सध्या पन्हाळा तालुक्यातील आसूर्ले - पोर्ले साखर कारखान्यांच्या आवारामध्ये वाडे खरेदी- विक्री जोमात सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

बीड व नगर जिल्ह्यातील बैल जोडीच्या साह्याने संसाराचा गाडा चालवणारी काही कुटुंब ऊस तोडीसाठी कोल्हापूर व सांगली जिल्ह्यामध्ये येतात. बैलासोबत आणलेल्या जनावरांना पुरेसा चारा ठेवून शिल्लक उसाच्या वाड्याचा



ढीग मारतात.हे उसाचे वाडे हिरवेगार असल्याने जनावरांसाठी चारा म्हणुन या वाड्याला चांगलीच मागणी असते. सध्या १०० रुपयाला पाच गऱ्यांची ३५ पेंडी अशी विक्री सुरू आहे. या उसाच्या वाड्याच्या विक्रीतून ऊसतोड मजुरांच्या संसाराला लागणाऱ्या चटणी मिठाचे पैसे उभे राहत असतात. कारखान्यात काम करणारी शेतकऱ्यांची मुले कामावरून सुटल्यानंतर हे उसाचे वाडे खरेदी करून घरी नेताना दिसत आहेत.

ऊसाच्या फडातही तोडणी झाल्यावर वाड्याची विक्री केली जाते. ऊस तोडल्यावर उसाच्या राहिलेल्या वरच्या भागाला वाडे असे म्हणतात. ऊसतोड मजूर आणि ट्रॅक्टर मालकाचा या उसाच्या वाड्यावर अधिकार असतो.

# लाडक्या बहिणींना डिसेंबरपासून २,१०० रुपये द्या! सुळेंची मागणी

■ नवी दिल्ली

**नवनिर्वाचित** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण लाडकी बहीण योजनेचे २१०० रुपये देणार असल्याचे काल स्पष्ट केले.अर्थसंकल्पात आम्ही त्याचा विचार आम्ही करु,असे फडणवीस म्हणाले. त्यांच्या याच वक्तव्याचा आधार घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारला पुन्हा एकदा या आश्वासनाची आठवण करुन दिली. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आता नवीन वर्ष सुरू होत आहे. त्यामुळे डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यापासूनच लाडक्या बहिणींचे १,५०० ऐवजी २,१०० रुपये जमा करा. आमची तर मागणी आहे की, ३,००० रुपये द्या. कारण आम्ही सत्तेवर आलो असतो, तर लाडक्या बहिणींना महिना ३ हजार रुपये देणार होतो. त्यामुळे शक्य असेल तर डिसेंबरपासूनच लाडक्या बहिणींच्या खात्यात महिना पैसे जमा करा.

# ईव्हीएमवर संशय! १०४ उमेदवारांनी व्हिव्हिपॅट पडताळणीसाठी अर्ज केले

■ मुंबई

**राज्य** विधानसभेच्या एकतर्फी निकालांमुळे ईव्हीएम यंत्राबद्दल सर्वत्र संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर अशी माहिती समोर आली आहे की, राज्यातील ३१ जिल्ह्यांमधील ९५ मतदारसंघांतील १०४ उमेदवारांनी व्हिव्हिपॅट पावत्या आणि ईव्हीएम यंत्रांमधील मते याची पडताळणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज दाखल केले आहेत.

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे. उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या अर्जांनुसार ७५५ मतदान केंद्रांवरील मतदानाची फेरतपासणी केली जाणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पडताळणीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांमध्ये कोपरी - पाचपाखाडी मतदारसंघामध्ये एकनाथ शिंदे यांच्यासमोर पराभूत झालेले शिवसेना ठाकरे गटाचे केदार दिघे, बारामती मतदारसंघातून अजित पवार



यांच्याकडून पराभूत झालेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युगेंद्र पवार, एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे (मुक्ताईनगर), माजी मंत्री राजेश टोपे (घनसावंगी), हितेंद्र ठाकूर (वसई) आणि त्यांचे पुत्र क्षितीज ठाकूर (नालासोपारा), काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात (संगमनेर), नसीम खान (चांदवली) यांचा समावेश आहे.

# पूर्व द्रुतगती मार्गावर घोडागाड्यांची शर्यत! अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल

**सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन तपास**

■ मुंबई

**मुंबईच्या** पूर्व द्रुतगती मार्गावर मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास घोडागाड्यांच्या अनधिकृत शर्यती झाल्या. पंतनगर पोलिसांनी आयोजक व सहभागी झालेल्यांवर स्वतःहून गुन्हा दाखल केला आहे. मंगळवारी पहाटे तीन ते चारच्या सुमारास घाटकोपर ते विक्रोळी दरम्यान ही शर्यत झाली. यामध्ये घोडागाड्यांबरोबरच अनेक तरुण मोटारसायकल व कारमधून सहभागी झाले होते. घाटकोपर पूर्वेला पेट्रोलपंपापासून या शर्यतीला सुरुवात झाली. ही शर्यत द्रुतगती मार्गावरुन विक्रोळीपर्यंत गेली. या शर्यतीचे अनेक व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाले. त्यातील एका व्यक्तीने पोलिसांना टॅग करत म्हटले की, मुंबई पोलीस झोपलेले असतांना शहरात घोड्यांची शर्यत झाली आहे. त्यानंतर पोलिसांनी स्वतःहून गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या शर्यतीचे अज्ञात आयोजक, घोडागाड्यांचे चालक, मालक व या शर्यतीत सहभागी असलेल्या इतरांवरही गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी या परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज आपल्या ताब्यात घेऊन तपास सुरु केला आहे. विनापरवानगी शर्यत आयोजित करणे, लोकांच्या जीवाला धोका निर्माण करणे, मुक्या प्राण्यांशी क्रुरतापूर्वक वर्तन करणे या कलमांखाली गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. रात्रीच्या वेळी गस्तीवर असलेले पोलीस यावेळी काय करत होते असाही प्रश्न उपस्थित केला.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# नव्या सरकारला कर्जाची पहिली सलामी

**नवे** सरकार स्थापन होत असतानाच मुख्यमंत्र्यांनी एका रुग्णाला पहिला मदतीचा चेक दिला. तिथून जरी राज्य कारभाराची सुरुवात झाली असली तरी त्याच्या दोन दिवस आधीच म्हणजेच शपथविधीच्या पूर्वसंध्येला नव्या सरकारला कर्जाची सलामी मिळालेली आहे. जागतिक बँकेने १ हजार ५९३ कोटींचे विकासकर्ज मंजूर केले आहे. इंटरनॅशनल बँक ऑफ रिकन्स्ट्रक्शन अँड रिडेव्हलपमेंट या बँकेने राज्याच्या मागास भागाच्या विकासासाठी हे कर्ज मंजूर केले आहे. प्रामुख्याने इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि तेही मागास भागाच्या विकासासाठी पहिल्यांदाच असे वेगळे कर्ज मिळालेले आहे. राज्याच्या विकासाची नेहमीच ग्वाही दिली जाते. परंतु त्यासाठी पैसा कुठून आणायचा हा नेहमीचा प्रश्न असतो. जी काही विकासकामे होत आहेत, त्यासाठी कर्ज घेतल्याशिवाय पर्याय उरत नाही. सध्या महाराष्ट्रावर नऊ लाख कोटींचे कर्ज आहे. आणि ते सगळे विकासासाठीच असल्याचा दावा केला जातो. आता त्या कर्जात आणखी ही नवी भर पडली आहे. विकासासाठी स्पर्धा करीत असताना कर्जाचा विळखाही अनिवार्य ठरतो, असा त्याचा अर्थ घ्यावा लागतो. म्हणूनच विकासाची गणिते मांडताना जे काही कर्ज घेतली जातात. त्याच्या परतफेडीचेही गणित मांडता आले पाहिजे. आता मिळालेले कर्ज हे पंधरा वर्षांच्या मुदतीसाठी मिळाले आहे. या पंधरा वर्षांत त्याची परतफेड होणार आहे का, याची खात्रीसुद्धा सरकारला देता आली पाहिजे. म्हणजे मग घेतलेल्या कर्जाचा या ठराविक मुदतीत या विशिष्ट कारणांसाठीच उपयोग झाला असे सांगता येऊ शकते. दुर्दैवाने महाराष्ट्रावर वाढत चाललेला कर्जाचा डोंगर हा निधीचा योग्य वापर होत नसल्याचेच निदर्शक आहे. विकासासाठी कोणतेही राज्य सरकार उत्सुक असते. आपल्या कार्यकाळामध्ये अधिकाधिक विकासाची कामे व्हावीत, असा त्यामागचा हेतू असतो. परंतु विकासाला आवश्यक ते अर्थकारण प्रत्यक्षात पाहायला मिळत नाही. त्यामध्ये मोठी तफावत दिसून येते.

**कर्जाचा वाढता डोंगर**

पायाभूत विकासाची कामे होताना दिसतात. त्याचा उपयोगही होतो. परंतु या सर्वांचा तो आर्थिक भार निर्माण होतो. त्याचा विचार केला तर विकासासाठी केला जाणारा कर्जरूपी खर्च हा जनतेच्या खिशातूनच वसूल केला जातो. हीदेखील वस्तुस्थिती आहे. आज मोठमोठे रस्ते, मेट्रो किंवा अन्य सेवासुविधा निर्माण होत असल्या तरी त्यावर होणारा खर्च आणि त्यातील अपेक्षित उत्पन्न याचा मेळ कधीच बसत नाही. आणि राजकारणी मंडळी त्याचा मेळ बसूही देत नाही. अगदी याचे ताजे उदाहरण म्हणजे वेगवेगळ्या रस्त्यांच्या वापरासाठी आकारला जाणारा टोल म्हणावा लागेल. त्याचे तर्कशास्त्र मांडताना रस्तेबांधणीसाठी आलेला खर्च हा टोलमधून वसूल व्हावा. तो खर्च भरून निघाला की, टोल घेणे बंद करावे असे साधारण त्याचे गणित मांडले जाते. परंतु मुंबई-पुणे द्रूतगती मार्गावर गेली पंधरा-वीस वर्षे वसूल होणारा टोल खर्च भरून निघाला तरी घेतला जातो. कारण नंतर मग रस्त्याच्या देखभालीचा खर्च त्या टोलमधूनच भागवायचा असतो. असे अफलातून कारण पुढे केले जाते. जेणेकरून टोल नावाच्या प्रकारातून अनेक संबंधितांचे खिसे भरत राहतात. याचा अर्थ विकासाचे प्रकल्प राबवत असताना खर्चाचा अंदाज सांगितला जातो. पण उत्पन्नाबाबत सगळीच सरकारे मौन असतात. आतादेखील मागास भागाच्या विकासासाठी जे पंधराशे कोटींचे कर्ज मिळणार आहे त्यात मागास भागासाठी नेमके कोणते प्रकल्प अनिवार्य आहेत, जे खऱ्या अर्थाने मागास भागाला दिलासा देऊ शकतील. आणि या कर्जाची परतफेड करताना हे सरकार कोणत्या पद्धतीने करणार आहे हेदेखील सांगता आले पाहिजे. तरच कर्जाचे कारण आणि त्याचसाठी ठेवले जाणारे तारण नेमकेपणाने लक्षात येईल. अन्यथा कर्जांचे डोंगर वाढत राहतात. पण त्याची परतफेड होत नाही. अशी आज सर्वसाधारण परिस्थिती आहे. सातत्याने वाढत जाणारा हा कर्जाचा डोंगर जर सामान्य माणसाच्या डोक्यावर बोजा टाकणारा ठरणार असेल तर त्याबाबतचा आढावा खूप गरजेचा ठरतो.

**जागतिक आर्थिक केंद्राचे स्वप्न**

अलिकडे तर महाराष्ट्राला जगाचे आर्थिक केंद्र करण्याचीही वल्गना झालेली आहे. आर्थिक केंद्र करायचे असेल तर ते स्वयंपूर्ण असणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा ते कर्जात बुडालेले आर्थिक केंद्र असेच त्याचे वर्णन करण्याची वेळ येईल. अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्राकडे प्रगती किंवा आर्थिक विकासाचा स्रोत मोठा आहे. आणि जर अशा प्रकारचे आर्थिक सशक्त चित्र महाराष्ट्राच्या वाट्याला आले असेल तर ते जपण्याचे कामही करावे लागेल. वेगाने विकास करायचा आहे, हे जरी खरे असले तरी त्या वेगाच्या नादामध्ये राज्याचे आर्थिक भान सुटता कामा नये. आज नऊ लाख कोटींचे कर्ज हा काही छोटा आकडा ठरत नाही. प्रत्येक राज्याची एक आर्थिक पतही रिझर्व्ह बँकेकडे असते. आणि ती पत पाहून कर्ज घेण्याची मर्यादादेखील ठरवली जाते. यापूर्वीसुद्धा सरकारकडून या कर्जाचे समर्थन करताना महाराष्ट्र पंधरा लाख कोटींपर्यंत कर्ज देऊ शकते एवढी त्याची रिझर्व्ह बँकेकडे आर्थिक पत आहे. परंतु इतकी मोठी आर्थिक पत असताना ती केवळ कर्जामध्ये खर्ची घालणे किंवा एकाअर्थी ही आर्थिक पतच कर्जासाठी गहाण ठेवणे हा प्रकार कितपत आर्थिक शहाणपणाचा ठरतो, हे नक्कीच विचारात घ्यावे लागेल. भविष्यकाळात जर आर्थिक केंद्र करायचे असेल तर राज्याचे आर्थिक उत्पन्न वाढवणे हे सर्वात महत्त्वाचे ठरते. ते उत्पन्न वाढवतानासुद्धा त्याचा बोजा सामान्य माणसावर पडता कामा नये. याचेही भान ठेवले जाणे महत्त्वाचे ठरते.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**कधी बोलायचे नाही, यापेक्षा कधी शांत बसायचे हे ज्याला कळले तो श्रेष्ठ.**

## पं चां ग

**शनिवार, ७ डिसेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**
**मार्गशीर्ष शुक्ल षष्ठी**
**नक्षत्र : धनिष्ठा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०५-०६ मकर**
**०५-०० ते २४-०० कुंभ**



**रवी उदय- ०७-००**
**रवी अस्त- १८-००**

**चंपाषष्ठी, स्कंदषष्ठी, मार्तंड भैरवोत्थापन, खंडोबा नवरात्र समाप्ती, ध्वजदिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## कविता...

### महापरिनिर्वाण दिनी



आज तुझ्या महापरिनिर्वाण दिनी
लाखो अनाथ भीम पाखरे

दुःखमय अंतकरणाने
तुझ्या मढवलेल्या देहावर
नतमस्तक होतात.

तुझी सावली शोधत
आम्ही भटकतो रात्रंदिन
पण तू विलीन झालास, 'बुद्धज्योतीत '
पहाटेची किरणे देखील
'बुद्धम शरणंम गच्छामी' म्हणत आहेत
तुझ्या महापरिनिर्वाण दिनी

झोपडपट्ट्यांमधून व रस्त्यारस्त्यांतून
भिमगीते गात होती तुझ्या विस्मृत प्रज्ञने
घडविला एक जागतिक इतिहास

आई - बाप माझा गुलामगिरीत होता
त्यांना जीवन जगण्याचा हक्क दिलास
शेवटी महामानवा ....

तुझा तेजोमय तारा
फुलारलेल्या वृक्षासारखा कोलमडला अन्
आम्हा भीमपाखरांना
तू, स्पुंदकर ठेवलंस.

**• बी.डी.गायकवाड •**
शहापूर / ठाणे
संपर्क -९५११७२२९२४





# दुसऱ्या कसोटीत भारताचा १८० धावांत खुर्दा ऑस्ट्रेलियाची दमदार सुरुवात! १ बाद ८६ धावा



**भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात मिचेल स्टार्कच्या भेदक माऱ्या समोर भारताचा पहिला डाव पत्त्याच्या बंगल्यासारखा अवघ्या १८० धावांमध्ये कोसळला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात दिवस अखेर १ बाद ८६ धावा केल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलिया मोठी धावसंख्या उभारण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे दिसत आहे. ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना भारताने जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतलेली आहे.**

■ ॲडलेड

ॲडलेडमधील दुसऱ्या कसोटी सामन्यात रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. पण त्याचा हा निर्णय आत्मघातकी ठरला. भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल याला स्टार्कने खातेही खोलू दिले नाही. त्यानंतर के. एल. राहुल आणि शुभमन गिल या जोडीने ६९ धावांची भागीदारी करून भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण स्टार्कने राहुलला ३७ धावांवर बाद करून ही जोडी फोडली. त्यानंतर स्टार्कने कोहलीला ७ धावांवर बाद करून भारताला आणखी एक धक्का दिला. आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी भारताला एका पाठोपाठ एक धक्के द्यायला सुरुवात केली.

पंतला कमिन्सने २१ धावांवर माघारी धाडले. तर कर्णधार रोहित शर्माला बोल्डने अवघ्या ३ धावांवर पायचित केले. नितेश रेड्डीने मात्र ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा चांगला सामना केला. त्याने ४२ धावा केल्या त्यालाही स्टार्कनेच बाद केले. पाठोपाठ त्याने अश्विनला २२, तर हर्षित रानाला शून्यावर बाद केले. बुमराहला कमिन्सने शून्यावर माघारी धाडले. सिराज ४ धावांवर नाबाद राहिला आणि अशा तऱ्हेने भारताचा पहिला डाव १८० धावांवर आटोपला. स्टार्कने ४८ धावांत ६ बळी घेतले तर कमिन्स व स्कोट बोलंडने प्रत्येकी २ बळी घेतले. त्यानंतर ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात बुमराहने सलामीवीर उस्मान ख्वाजाला १३ धावांवर बाद करून कांगारूंना पहिला धक्का दिला. पण त्यानंतर लॅब्युशन आणि मॅक्सवेनी यांनी डाव सावरला.

पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या १ बाद ८६ धावा झाल्या आहेत. लॅब्युशन २० तर मॅक्सवेनी ३८ ही जोडी नाबाद आहे.

## महेकच्या शतकाच्या जोरावर व्हिक्टरी क्रिकेट क्लब विजयी

■ ठाणे

डॉ. राजेश मढवी स्पोर्ट्स असोसिएशन आणि दैवेज्ञ क्रिकेट क्लब आयोजित पाचव्या अर्जुन मढवी स्मृती महिला एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत व्हिक्टरी क्रिकेट क्लबने २९३ धावांचा पाठलाग करणाऱ्या स्पोर्ट्स फिल्ड क्रिकेट क्लबला ९१ धावांत गुंडाळत मोठा विजय मिळवला. सलामीला आलेल्या महेक पोकरची कर्णधारपदाला साजेशी धडाकेबाज शतकी खेळी हे व्हिक्टरी क्रिकेट क्लबने स्पोर्ट्स फिल्ड क्रिकेट क्लबवर मिळवलेल्या मोठ्या विजयाचे वैशिष्ट्य ठरले.

सेंट्रल मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेतील पाचव्या सामन्यात महेक आणि अलीना मुल्ला या सलामीच्या जोडीने दिड शतकी भागीदारी रचत संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या दोघींनी पहिल्या विकेटसाठी १५५ चेंडूंत १८४ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. अलिना ६१ धावांवर बाद झाली. महेकने १०१ चेंडूंत २० चौकार मारत ११२ धावा केल्या. क्रितिका

## झिम्बाब्वेने पाकिस्तानला हरविले

■ हरारे

**झिम्बाब्वे** विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील तिसऱ्या टी-२० सामन्यात झिम्बाब्वेने पाकिस्तानचा २ गडी राखून पराभव केला. विशेष म्हणजे दोन्ही संघांतील एकाही खेळाडूला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. मात्र पाकिस्तानने हि मालिका २-१ ने जिंकली आहे.

पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात७ बाद १३२ धावा केल्या कर्णधार आगाने३२ धावा केल्या. तर अन्य तिघांनी २० -२२ धावा केल्या . झिम्बाबवेची सुधा तशीच स्थिती झाली होती. सलामीवीर बेनेटने ४३ धावा केल्या इतरांना प्रत्येकी २० धावाही करता आल्या नाहीत. कर्णधार सिकंदर रझा केवळ १९ धावाच करू शकला. ५ फलंदाजांना तर दोन आकडी धावसंख्याही करता आली नाही तरीही झिम्बाबवेने पाकिस्तानवर २ गडी खूंन विजय मिळवला पण मालिका मात्र गमावली.

## प्रो कबड्डी लीग! दबंग दिल्लीने युपी योद्धाला बरोबरीत रोखले

■ पुणे

**शेवटच्या** सेकंदापर्यंत उत्कंठा पूर्ण झालेल्या लढतीत दिल्ली दबंग संघाने युपी योद्धा संघाला ३२-३२ असे बरोबरीत रोखले आणि प्रो कबड्डी लीगमध्ये आपले आव्हान कायम राखले.

श्री छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत सामन्यातील शेवटच्या चढाईमध्ये दिल्लीच्या नवीन कुमारने एक गडी बाद करीत संघाला ३२-३२ अशी बरोबरी साधून दिली. एक मिनिट बाकी असताना दिल्लीचा संघ दोन गुणांनी पिछाडीवर होता.



मात्र, आशु मलिक याने एका चढाईत दोन गडी टिपून बरोबरी साधली होती. त्याची पकड करताना युपी योद्धा संघाने केलेली चूक दिल्लीच्या पथ्यावर पडली.

यूपी योद्धा संघाने येथील पहिल्या लढतीत काल तेलगू टायटन्स विरुद्ध शानदार विजय मिळवला होता. दबंग दिल्ली व युपी योद्धा यांच्यातील सामन्यात सुरुवातीपासूनच चुरस होती. आठव्या मिनिटाला सात सात अशी बरोबरी होती. मात्र नंतर युपी योद्धाने तीन गुणांची आघाडी घेतली खरी. तथापि दिल्ली संघाने जोरदार चढाया करीत मध्यंतराला १३-१२ अशी नाममात्र आघाडी मिळवली. त्यावेळी दिल्ली संघाला यूपी संघावर लोण नोंदवण्यासाठी हुकमी संधी मिळाली होती.

## मुश्ताक अली चषक स्पर्धेमध्ये मुंबईचा आंध्रवर विजय! रहाणेचे शतक हुकले

■ हैदराबाद

**टीम** इंडियाचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे याने सय्यद मुश्ताक अली २०२४ स्पर्धेत झंझावाती खेळी केली आहे. अजिंक्य रहाणे याने आंध्र विरुद्ध हैदराबादमधील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये झालेल्या सामन्यात विस्फोटक खेळी केली. अजिंक्यने आंध्रकडून मिळालेल्या २३० धावांच्या विजयी आव्हानाचा पाठलाग करताना ९५ धावांची स्फोटक खेळी केली. रहाणेच्या या खेळीमुळे मुंबईला आंध्र विरुद्ध ३ चेंडू राखून ४ विकेट्सने हा सामना जिंकता आला. मात्र अजिंक्य रहाणे थोडा दुर्दैवी ठरला. अजिंक्यचे शतक अवघ्या ५ धावांनी हुकले. मात्र रहाणेच्या याच खेळीमुळे मुंबईचा विजय सोपा झाला, हे मात्र नक्की. रहाणेला शतक पूर्ण करता आले नाही.

## १३ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीचे आशिया कप स्पर्धेत सलग दुसरे अर्धशतक

■ शारजाह

**१९ वर्षांखालील** आशिया कप स्पर्धेतील सेमी फायनल लढतीत भारतीय संघातील १३ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने सलग दुसरे अर्धशतक झळकावले आहे. शारजाहच्या मैदानात रंगलेल्या दुसऱ्या सेमी फायनलमध्ये श्रीलंकेच्या संघाने पहिल्यांदा बॅटिंग करताना ४३.३ षटकात १७३ धावा केल्या.

या धावांचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे या जोडीने भारतीय संघाच्या डावाची सुरुवात केली. आयुष म्हात्रे आणि वैभव या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ९१ धावांची दमदार भागिदारी करत टीम इंडियाला दमदार सुरुवात करून दिली. आयुष ३४ धावा करून माघारी परतला. दुसऱ्या बाजूला वैभव सूर्यवंशी याने २४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. जपान विरुद्धच्या सामन्यानंतर आशिया कप स्पर्धेतील सलग दुसऱ्या सामन्यात त्याच्या भात्यातून अर्धशतकी खेळी आल्याचे पाहायला मिळाले. जपान विरुद्धही त्याने अर्धशतक झळकावले होते.

## जय शंकर चौक, शिवकन्या मंडळाची आगेकूच कायम

■ मुंबई

**जय** शंकर चौकने द्वितीय श्रेणीत, तर शिवकन्या मंडळाने कुमारी गटात मुंबई उपनगर जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पूर्व विभागात उपांत्यपूर्व फेरीत मजल मारली. कांदिवली, सेक्टर - २ येथील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर आयोजित कबड्डी स्पर्धेत जय शंकरने अश्वमेध प्रतिष्ठानचा दुबळा प्रतिकार परतवून लावला. सचिन जाधव, रोहित आरोटे या विजयाचे शिल्पकार ठरले.



शिवकन्या मंडळाने कुमारी गटात चेंबूर क्रीडा केंद्राला नमवित या गटात उपांत्यपूर्व फेरी गाठली. पूर्वार्धात ०९-११ अशा पिछाडीवर पडलेल्या शिवकन्याने उत्तरार्धात आक्रमक खेळ करीत ९ गुणांनी सामना आपल्या बाजूने झुकविला. महिला गटात वंदे मातरम्ने आकाश स्पोर्ट्सचा सहज पाडाव करीत तिसरी फेरी गाठली. प्रसिता पन्हाळकर, रिया निंबाळकर यांच्या झंझावाती खेळाने हा विजय सोपा केला.

प्रथम श्रेणी पुरुषात

**जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा**

शितलादेवी संघाने गुरुकृपा संघावर आरामात विजय मिळवला. पुरुष द्वितीय श्रेणी गटात शिवरदेवने शिव मराठाचा तर संघर्षने के.आर. टी.चा पराभव करीत तिसरी फेरी गाठली.

# 'वात्सल्य'च्या मर्यादा

**'एनपीएस वात्सल्य' ही राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत एक विशेष योजना आहे, जी लहान मुलांसाठी तयार करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत, मुलाचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असले तरीही पालक त्यांच्या मुलांच्या सेवानिवृत्तीसाठी आधीच बचत सुरू करू शकतात. मूल १८ वर्षांचे झाल्यावर 'वात्सल्य' योजनेचे आपोआप सामान्य एनपीएस योजनेत रूपांतरित होते. या योजनेंतर्गत खाते उघडताना पालकांना १,००० रुपये प्रारंभिक रक्कम जमा करावी लागेल. यानंतर, दरवर्षी किमान १,००० रुपये योगदान अनिवार्य आहे. या योजनेत गुंतवणूकीची कमाल मर्यादा नाही, म्हणजेच तुम्ही तुम्हाला पाहिजे तितकी गुंतवणूक करू शकता.**



पालक वात्सल्य योजनेत एकूण जमा केलेल्या रकमेच्या २५% पर्यंतची रक्कम तीन वर्षांनंतर काढू शकतात. हे पैसे शिक्षण, गंभीर आजार किंवा अपंगत्व या कारणांसाठीच काढता येतात. मूल १८ वर्षांचे होईपर्यंत पालक फक्त तीन वेळा पैसे काढू शकतात. ही योजना पालकांना चक्रवाढ व्याजाद्वारे त्यांच्या मुलाचे भविष्य सुरक्षित करण्याची संधी देते. परंतु सुकन्या समृद्धी योजना, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी आणि म्युच्युअल फंड यांसारख्या इतर गुंतवणूक पर्यायांच्या तुलनेत यात काही मर्यादा आहेत.

इक्विटी म्युच्युअल फंडांमध्ये एनपीएस म्युच्युअल फंडांपेक्षा जास्त जोखीम आणि उच्च परताव्याची क्षमता असते. 'वात्सल्य'मध्ये इक्विटी आणि कर्ज या दोन्हींचे मिश्रण असल्यामुळे तो कमी जोखमीचा पर्याय ठरतो.

इक्विटी म्युच्युअल फंडाची तरलता एनपीएस विश्वापेक्षा चांगली आहे. कारण तुम्ही तुमची रक्कम कधीही काढू शकता. 'वात्सल्य'मध्ये मूल १८ वर्षांचे होईपर्यंत लॉक-इन कालावधी असतो. ठरावीक




कारणासाठी यातील काही भाग काढता येतो.

'वात्सल्य'ची निर्मिती प्रामुख्याने सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याचा विचार करुन केली गेली आहे; तर इक्विटी म्युच्युअल फंड विविध आर्थिक उद्दिष्टांसाठी वापरले जाऊ शकतात.

उदाहरणार्थ, जर तुमचे मूल आता १० वर्षांचे असेल आणि तुम्ही त्याच्यासाठी पेन्शन खाते उघडले असेल, तर दर महिन्याला १०,००० रुपये ठेवी पुढील ५० वर्षांमध्ये सुमारे १० कोटींमध्ये बदलू शकतात. तथापि, ६% महागाई दराने हा निधी त्यावेळी फक्त ५० लाख इतकाच असेल. परंतु जर तुम्ही दरवर्षी गुंतवणुकीत १० टक्के वाढ केली तर मुलांसाठी खूप प्रयत्न न करता एक चांगला सेवानिवृत्ती निधी तयार करता येईल.

दुसरीकडे, सुकन्या समृद्धी योजना किंवा म्युच्युअल फंडाच्या चाइल्ड प्लॅन्स अशा प्रकारे डिझाइन केल्या आहेत की नियमित गुंतवणूक तुमच्या मुलाच्या आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे, जसे की उच्च शिक्षण, उद्योजकता, विवाह इत्यादींसाठी कामी येऊ शकते. म्युच्युअल फंड, विशेषत: मुलांच्या खर्चासाठी असलेले फंड, सक्रियपणे व्यवस्थापित केले जातात आणि १२-१५ टक्क्यांपर्यंत परतावा देण्यासाठी दीर्घ लॉक-इन कालावधी असतात. बाजारात जोखीम असली तरी ती दीर्घकाळात ती संतुलित राहते. याचा अर्थ असा की जेव्हा तुम्हाला त्याची सर्वात जास्त गरज असते तेव्हा तुमच्याकडे मोठा निधी आणि चांगली तरलता असते.

समजा जर तुम्ही दोन म्युच्युअल फंड योजनांमध्ये ५००० ची गुंतवणूक केली, एक ८ वर्षांसाठी आणि दुसरी १२ वर्षांसाठी, तर तुम्हाला यामधून अनुक्रमे ८ लाख आणि १५ लाखांची तरलता मिळेल. त्या तुलनेत, तुम्ही वात्सल्य मधून जास्तीत जास्त २५% पैसे काढू शकता. तुम्ही १२ व्या वर्षाच्या शेवटी ही रक्कम काढली तर तुम्हाला सुमारे ६.३ लाख मिळतील.

म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीची रक्कम तुमच्या गरजेनुसार समायोजित केल्यास, तुम्ही तुमच्या मुलाचे पदवीपूर्व आणि पदव्युत्तर शिक्षण जास्त ताण न घेता पार पाडू शकता. तुमच्या मुलाला मोठ्या कर्जाची गरज भासणार नाही. एनपीएस वात्सल्यमध्ये कमी परतावा आणि मर्यादित तरलतेमुळे हे शक्य होत नाही. वात्सल्य ही दीर्घकालीन गुंतवणूक योजना असून त्यात आवश्यक लवचिकता नाही. त्यामुळे तुमच्या गुंतवणुकीत विविधता आणणे आणि वात्सल्य हा म्युच्युअल फंडासारख्या योजनांसह तुमच्या एकूण गुंतवणुकीच्या पोर्टफोलिओचा एक छोटासा भाग बनवण योग्य ठरेल.

# सीरियात आढळले जगातील सर्वांत जुन्या वर्णमालेचे पुरावे

■ वॉशिंग्टन




**पुरातत्व** विभागाच्यावतीने करण्यात आलेल्या उत्खननातून आता जगातील सर्वात जुन्या वर्णमालेचे पुरावे समोर आले आहेत. सीरियातील एका अतिप्राचीन थडग्यामध्ये हे पुरावे मिळाले असून यातूनच वर्णमालेचा जन्म नेमका कधी झाला होता,याविषयीचे संकेत पाहायला मिळत आहेत.

पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी अमेरिकन सोसायटी ऑफ ओवरसीज रिसर्चच्या वार्षिक बैठकीदरम्यान या शोधाची माहिती दिली. मातीच्या साधारण लंबवर्तुळाकार वस्तूवर असणार्या काही गोष्टी दूर केल्यानंतर एक अशी लिखाणाची शैली समोर आली की,जी साधारण इसवी सन पूर्व २४०० मधील असल्याचे सांगितले जाते. कोणतीही अक्षरे ज्ञात असण्यापूर्वी साधारण ५०० वर्षांच्या आधीच्या कालखंडातील ही तेव्हाची बाराखडी अर्थात वर्णमाला असल्याचे सांगितले जात आहे. पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी पश्चिम सीरियातील टेल उम्म-एल मार्रा इथून या वस्तू मिळवल्या.साधारण मागील १६ वर्षांपासून सुरू असणार्या उत्खननामध्ये सुरुवातीला कांस्य युगातील थडगी सापडली.एका थडग्यामध्ये ६ मानवी सापळेही सापडले.तसेच सोने,चांदीचे दागिने, स्वयंपाकाची भांडी, एक भाला, मातीची भांडी आणि याच भांड्यांच्या शेजारी मातीच्या लंबवर्तुळाकार गोष्टी आढळल्या. रेडियो कार्बन डेटिंगच्या विश्वसनीय वृत्तानुसार ही थडगी, कलाकृती आणि लेखन साहित्य साधारण ४४०० वर्षांपूर्वीचे आहेत. वर्णमाला असणार्या वस्तूंचा शोध घेणार्या प्राध्यापक ग्लेन श्वार्ट्ज यांच्या माहितीनुसार बाराखडीच्या लेखनशैलीने लेखनकलेतच क्रांती आणली.कारण,ही बाराखडी राजघराणी आणि समाजात मानाचे स्थान असणार्यांसाठी अधिक सुलभ ठरली.वर्णमाला लेखनाने नागरिकांच्या जगण्याची, विचार करण्याची आणि संवाद साधण्याची पद्धत बदलली.

# मीरा रोडमध्ये वृद्ध महिलेला ओलीस ठेवून दागिने लुटले

■ मिरा रोड

**मिरा** रोडच्या लक्ष्मी पार्क देवदर्पण सोसायटीत ७२वर्षीय फातिमा युसूफ ज्वाले यांना चोरट्याने तब्बल आठ तास ओलीस ठेवून त्यांच्याकडून ५ लाख रुपयांचे दागिने लुटले.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

वायरमन असल्याचे भासवत चोरटा रात्री ९ वाजता फातिमा यांच्या घरात घुसला. त्याने दार उघडल्यावर महिला चाकू धाक दाखवला. त्यानंतर त्यांना मारहाण करत त्यांचे दागिने काढले आणि त्यांना बेडरुममध्ये कोंडले. चोरटा रात्रीभर घरातच थांबला आणि पहाटे ५ वाजता फरार झाला. सकाळी फातिमा यांच्या पुतणीने त्यांना गंभीर अवस्थेत पाहिले. त्यानंतर मीरा रोड पोलिसांना कळवले.

# भंडारा जिल्ह्यात दोन अपघात विद्यार्थ्याचा मृत्यू! १७ मजूर जखमी

दोन मजूर गंभीर

■ भंडारा

**भंडारा** जिल्ह्यात आज दोन अपघात झाले. बीड-सितेपार मार्गावर भरधाव ट्रकने दिल्याने दुचाकीला जोरदार धडक दिली.त्यात विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, तर अन्य एका अपघातात मजुरांना घेऊन जाणारे वाहन उलटले.यामध्ये १५ मजूर जखमी झाले. त्यातील दोन मजूर गंभीर जखमी आहेत.

करण रणवीर बांते (१८) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून तो आपल्या ताईला सातोना येथे सोडून परतत असताना हा अपघात झाला. त्यानंतर लोकांनी आक्रोश व्यक्त करत ट्रक अडवला .मात्र ट्रकचालक पसार झाला.भंडाराच्या करडी येथे मजुरांना घेऊन जाणारे पिकअप वाहन उलटले. यामध्ये १७ मजूर जखमी झाले. त्यातील दोन मजूर गंभीर जखमी आहेत. जखमी झालेल्या १५ मजूरांना तुमसर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले तर गंभीर असलेल्या दोन मजूरांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

भंडारा जिल्ह्यात मागील आठवड्याभरातच अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. यामध्ये मोहाडी,एलोरा पेपर मिल, वैनगंगा नदी पूल,बीड अशा अनेक ठिकाणी जड व भरधाव वाहनांच्या अपघाताच्या घटना घडल्या.

# कोरगाव, कराड उत्तर, पाटणमध्येही उमेदवारांकडून यंत्रे पडताळणीचे अर्ज

■ सातारा

**मतदानयंत्रांच्या** तपासणीसाठी कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील आमदार शशिकांत शिंदे आणि कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार माजी आमदार बाळासाहेब पाटील तसेच पाटण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार सत्यजित पाटणकर यांनी निवडणूक शाखेकडे पैसे भरले आहेत. या तिघांनी मतदान यंत्रे तपासणीची मागणी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे.

कोरेगाव विधानसभा मतदारसंघातून शशिकांत शिंदे यांनी यापूर्वीच मतदान यंत्रांच्या तपासणीसाठी सुमारे ६ लाख ५० हजार रुपये जिल्हा निवडणूक शाखेकडे भरले आहेत. तसेच कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार बाळासाहेब पाटील यांनी ४ लाख ७२ हजार रुपये व पाटण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार सत्यजित पाटणकर यांनी १ लाख ४१ हजार ६०० रुपये निवडणूक शाखेकडे भरले आहेत.

दरम्यान,आक्षेप येण्याची शक्यता गृहित धरून निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रशासनाकडून मतदान यंत्रांची काळजी घेतली जात आहे.

# राहुल गांधींच्या नागरिकत्वाचा वाद हायकोर्टाने केंद्राकडे उत्तर मागितले

■ नवी दिल्ली

**काँग्रेसचे** खासदार राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाबाबत दाखल केलेल्या भाजपा नेते सुब्रमण्यम स्वामी यांच्या याचिकेवर आज दिल्ली हायकोर्टाने केंद्र सरकारला आपली भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले.या प्रकरणाची सुनावणी १३ जानेवारी रोजी होणार आहे.

राहुल गांधी यांचे भारतीय नागरिकत्व रद्द करण्याच्या मागणीसाठी सुब्रमण्यम स्वामी यांनी दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल केली होती. केंद्र सरकारच्या प्रॉक्सी वकिलाने खंडपीठाला सांगितले की,या खटल्यातील सरकारच्या पूर्वीच्या प्रतिनिधीची वरिष्ठ वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि नवीन वकिलाला या प्रकरणात पूर्णत:उपस्थित राहण्यासाठी वेळ लागणार आहे.

# माजी नगरसेवक टिंगरेंवर हल्ला पुण्यातून दोन जणांना अटक

■ पुणे

**विधानसभा** निवडणुकीच्या प्रचार कालावधीत शरद पवार गटात प्रवेश केल्यानंतर माजी नगरसेवक चंद्रकांत टिंगरे यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. यात टिंगरे जखमी झाले होते. चंद्रकांत टिंगरे यांच्या पत्नी माजी नगरसेविका रेखा टिंगरे यांनी यासंदर्भात तक्रार दिली होती. महायुतीचे उमेदवार आणि आमदार सुनील टिंगरे यांच्या सांगण्यावरून त्यांच्या कार्यकर्त्यांनी आपल्याला मारहाण केली असा आरोप त्यांनी केला होता. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी रेवण तानाजी लगस आणि प्राणजीत अच्युत शिंदे या दोन आरोपीना अटक केली. धानोरी प्रभागाच्या माजी नगरसेविका रेखा टिंगरे आणि त्यांचे पती चंद्रकांत टिंगरे यांनी सुरुवातीला महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांना पाठिंबा दिला होता. मात्र विधानसभा निवडणुकीत दुसऱ्या पक्षात प्रवेश करून बापूसाहेब पाठारे यांना पाठिंबा दिला, याचा राग मनात धरून दगडफेक केल्याचे आरोपींच्या चौकशीत समोर आले.

# विरारमध्ये श्री दत्तजयंतीनिमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह

■ विरार



**परब्रम्ह** भगवान श्री स्वामी समर्थ महाराज व प.पु. गुरुमाऊली: आण्णासाहेब मोरे (प्रमुख: अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ -त्रंबकेश्वर) यांच्या आशीर्वादाने अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ (त्रंबकेश्वर), श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यत्मिक विकास (दिंडोरी प्रणित)मार्ग जि. नाशिक, शाखा एक्स्पर्ट स्कूल सेवा केंद्र आणि कारगील सेवा केंद्राच्या (विरार)वतीने श्री दत्तजयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सोमवार ९ ते सोमवार १६ डिसेंबर २०२४ रोजी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र एक्स्पर्ट स्कूल, स्मार्ट बाजारजवळ, विरार (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला आहे.

सप्ताह कालावधीत श्री स्वामी समर्थ महाराजांची प्रहर सेवा (विनावादन, जप, श्री स्वामीचरित्र वाचन) अखंडपणे सुरू असणार आहे. श्री गणेश याग, गीताई याग, स्वामी याग, चंडी याग, रुद्र याग, मल्हारी यागासह विविध यज्ञ संपन्न होतील. सामूहिक श्री गुरुचरित्र पारायण करण्याची संधी प्राप्त होणार आहे, सामूहिक श्री स्वामीचरित्र सारामृत व श्री दुर्गा सप्तशती पाठ, सप्ताह दरम्यान बालसंस्कार, प्रश्नोत्तर मार्गदर्शन, विवाह संस्कार, कृषी, पर्यावरण प्रकृती, स्वयंरोजगारसह विविध विभागांचे प्रदर्शन, श्री जनकल्याण योजना स्टॉल, श्री क्षेत्र पीठापुर अन्नदान स्टॉल, सांस्कृतिक कार्यक्रम इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांना, नागरिकांना, स्वामी भक्तांना याचा लाभ होणार आहे.

# साक्रीत बिबट्याने एका रात्रीत १५ शेळ्यांचा फडशा पाडला



■ धुळे

**साक्री** तालुक्यातील दातर्ती शिवारात बिबट्याचा वावर वाढला आहे.परवा रात्री बिबट्याने एका शेतातील शेडमधील शेळ्या-बोकडांवर हल्ला चढवत थैमान घातले. त्यात तब्बल १५ शेळ्या व बोकडांना ठार केले. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने तत्काळ बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी केली आहे.

दातर्ती येथील शेतकरी दादाजी त्र्यंबक देसले यांच्या गाव शिवारातील शेतातील शेडमध्ये रात्रीच्या सुमारास बिबट्याने प्रवेश करीत बकरी,बोकड व बकरीच्या पिल्लांवर हल्ला केला. या बिबट्याच्या हल्ल्यात ८ बोकड, २ शेळी (बकऱ्या), ५ पिल्लू ठार झाले. तर दोन शेळ्या जखमी झाल्या आहेत. काल सकाळी शेतकरी देसले हे शेतात आले असता त्यांना बोकड व शेळ्या मृतावस्थेत दिसून आल्या. बिबट्या अथवा एखाद्या हिंस्त्र प्राण्याने हा हल्ला केल्याचा अंदाज व्यक्त केला.याबाबत त्यांनी वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच वनपाल डी. डी. अहिरे, वनमजूर पंडित खैरनार यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी करून वनपाल अहिरे यांनी पंचनामा केला.

# सत्यजित तांबेंनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली

■ मुंबई



**काँग्रेसकडून** वेटिंगवर असलेले नाशिक पदवीधर मतदारसंघातील अपक्ष आमदार व काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांचे भाचे सत्यजित तांबे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. सत्यजित तांबे यांनी या भेटीचा फोटो समाजमाध्यमांवर शेअर केला आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीत सत्यजित तांबे यांच्या उमेदवारीवरून मोठे राजकारण रंगले होते. कारण काँग्रेसने त्यांच्या वडिलांना उमेदवारी दिली होती. पण त्यांनी ती नाकारून आपल्या मुलाला निवडणुकीत उतरवले. होते. ही निवडणूक सत्यजित जिंकलेही होते. तेव्हापासून ते अपक्षच आहेत. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत बाळासाहेब थोरात यांचा पराभव झाला. आपण मुख्यमंत्री फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतल्याचे सत्यजित तांबे यांनी सांगितले असले तरी या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# केजरीवालांची याचिका फेटाळली हायकोर्टाचा लवकर सुनावणीस नकार

■ नवी दिल्ली

**मद्य** धोरण घोटाळ्यातील आरोपी असलेले अरविंद केजरीवाल सध्या जामिनावर बाहेर आहेत. ईडीने त्यांना २१ मार्च रोजी मद्य धोरण प्रकरणी अटक केली होती. त्यानंतर २६ जून रोजी सीबीआयने त्यांना तुरुंगातून ताब्यात घेतले. दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी अरविंद केजरीवाल यांच्या प्रकरणावर लवकर सुनावणी करण्यास नकार दिला.

केजरीवाल यांनी सुनावणी २० डिसेंबरच्या नियोजित तारखेपूर्वी करण्यासाठी याचिका दाखल केली होती. त्यांची याचिका फेटाळण्यात आली. न्यायमूर्ती मनोज कुमार ओहरी म्हणाले



की, नियोजित तारखेलाच सुनावणी होईल.आम्हाला अजून बरीच प्रकरणे ऐकायची आहेत.

# थंडीमुळे संभाजीनगरात शाळांच्या वेळांमध्ये बदल

■ संभाजीनगर

**राज्यात** थंडीचा कडाका वाढणार असल्याने सकाळच्या थंडीमध्ये लहान मुलांना होणारा त्रास लक्षात घेऊन चौथीपर्यंतचे वर्ग आता सकाळी नऊ वाजता भरवण्यात यावेत, असे आदेश संभाजीनगरच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांना दिले आहेत

राज्यात थंडी सुरू होऊनही शाळांच्या वेळा बदलण्याबाबत प्रशासनाने लक्ष दिले नव्हते. मुलांनी नियमित शाळेत यावे; यासाठी त्यांच्या आरोग्याचीदेखील काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शाळेची वेळ छोट्या मुलांसाठी सकाळी नऊनंतरच असावी, अशी विनंती पालकांनी शिक्षण विभागाला केली होती.

आता छत्रपती संभाजीनगरच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी सर्व शाळा - संस्थाचालकांना सूचना करीत सकाळी नऊ वाजल्यानंतर शाळा भरवा असे आदेश काढले आहेत. यामुळे जिल्ह्यातील सर्व पूर्व प्राथमिक ते चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी नऊ किंवा नऊ वाजल्यानंतर भरवण्यात यावेत, असे आदेश शिक्षणाधिकारी यांनी दिले आहेत. महापालिकेचे शिक्षणाधिकारी आणि पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना यासंदर्भात सूचना दिल्या आहेत. आदेशाचे पालन न केल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

# राज्यात अवकाळी पावसाचा रब्बी पिकांना फटका

**मुंबई** - बंगालच्या उपसागरातील 'फेंगल' चक्रीवादळामुळे राज्यात पावसाला पोषक हवामान तयार होऊन अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. आज नाशिक,कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, धुळे,नांदेड, वाशीम या ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे रब्बी पिकांना फटका बसला आहे. नाशिक शहरातील नाशिकरोड, पंचवटी, सिडको, सातपूर भागात रब्बी हंगामातील कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी महागड्या दराने बियाणे खरेदी करून कांदा रोपे लावली होते. या अवकाळी पावसाने कांदा रोपे खराब होऊन नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली. शिलापूर परिसरात काल मध्यरात्री अचानक आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली.

# पद्मश्री डॉ.मनोहर डोळे यांचे वृद्धापकाळाने निधन

■ पुणे



**पुणे** जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सर्वात पहिला पद्मश्री पुरस्कार मिळालेले डॉ.मनोहर कृष्णाजी डोळे (९७)यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या मागे एक मुलगी, दोन मुले व नातवंडे असा परिवार आहे.डोळे यांचा जन्म १९२८ साली झाला होता. त्यांचे वैद्यकीय क्षेत्रात मोठे कार्य होते.१९९२ साली त्यांनी निमदारी येथे आदिवासी मुलांसाठी वसतिगृहाची स्थापना केली. गरीब रुग्णांसाठी मोहन ठुसे नेत्र रुग्णालय त्यांनी नारायणगाव येथे १९८२ साली सुरू केले. कबड्डी खेळाचा त्यांना जास्त छंद होता.त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले होते.

# आरबीआयच्या पत धोरणामुळे शेअर बाजारात मोठी घसरण

■ मुंबई

**रिझर्व्ह** बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी यांनी आज तिमाही पतधोरण जाहीर करताच त्याचा नकारात्मक परिणाम शेअर बाजारावर झाला. रिझर्व्ह बँकेने रेपो रेट न वाढवता तो ६.५ टक्के कायम राखल्याने बाजारात घसरण दिसून आली.

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक दिवस अखेरीस ५६.७४ अंकांनी घसरून ८१,७०९.१२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ३०.६० अंकांच्या घसरणीसह २४,६७७.८० अंकांवर बंद झाला. आजच्या व्यवहारांत मुंबई शेअर बाजारात सुचीबद्ध असलेल्या ३० कंपन्यांपैकी १७ कंपन्यांचे शेअर घसरले. तर १३ कंपन्या नफ्यात होत्या.

# पादचारी दिनानिमित्त पुण्यातील लक्ष्मी रस्ता बंद

■ पुणे

**पादचारी** दिनानिमित्त ११ डिसेंबर रोजी लक्ष्मी रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे.लिंबराज महाराज चौक (नगरकर तालीम चौक)ते गरुड गणपती चौक दरम्यान सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी सांगितले.

लक्ष्मी रस्त्याने नगरकर तालीम चौकातून टिळक चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना नगरकर तालीम चौकातून डावीकडे वळून बाजीराव रस्ता,अप्पा बळवंत चौकमार्गे ने जावे लागणार आहे. कुमठेकर रस्त्याने लक्ष्मी रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांनी शनिपार चौक (चितळे कार्नर)येथून वळून बाजीराव रस्तामार्गे अप्पा बळवंत चौकमार्गे जावे. नारायण पेठेतील लोखंडे तालीम चौकातून लक्ष्मी रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांना केळकर रस्ता,टिळक चौकमार्गे इच्छितस्थळी जावे लागणार असल्याचे अमोल झेंडे यांनी सांगितले.

पाहिजेत
फोर कलर कोमोरी प्रिंटींग मशिन साठी
ऑपरेटर व पेपर फीडरमनची नेमणूक करणे आहे.
तरी कृपया गरजूनी दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटावे अथवा संपर्क साधावा.
नेक्स्टजेन कलर्स प्रिंटींग प्रेस
एच -१ ब्लॉक, उद्यम नगर को. ऑप. सोसायटी, वाय. पी. पोवार नगर, कोल्हापूर
संपर्क - मो. 9822094663, 7020061909

नवाकाळ

web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com

# चंदेरी च्वींगम

## मालिकेसाठी नवी भाषा केली आत्मसात



स्टार प्रवाहवर २३ डिसेंबरपासून 'तू ही रे माझा मितवा'ही नवी मालिका सुरु होतेय. अभिनेत्री **शर्वरी जोग** या मालिकेत ईश्वरी या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या भूमिकेविषयी शर्वरीने काही खास गोष्टी सांगितल्या.

**शर्वरी, मुख्य नायिकेची भूमिका असलेली ही तुझी दुसरी मालिका. या मालिकेचं काय वेगळेपण आहे?**

स्टार प्रवाहसोबत पुन्हा एकदा काम करण्याची संधी मिळतेय याचा मनापासून आनंद आहे. 'तू ही रे माझा मितवा' मालिकेत एक अनोखी लव्हस्टोरी पाहायला मिळेल. अनोखी यासाठी कारण ईश्वरी आणि अर्णव एकमेकांच्या प्रेमात जितके आहेत तितकेच ते एकमेकांचा तिरस्कारही करतात. म्हटल तर एकमेकांशिवाय जगता येत नाही आणि म्हटलं तर एकमेकांसोबत राहताही येत नाही. थोडक्यात प्रेम करुन कात्रीत सापडलेल्या अर्णव आणि ईश्वरीची हटके लव्हस्टोरी म्हणजे 'तू ही रे माझा मितवा' ही मालिका. मला खात्री आहे प्रेक्षकांना ही हटके लव्हस्टोरी नक्की आवडेल.

**या मालिकेतल्या तुझ्या पात्राविषयी सांग..?**

ईश्वरी एक अत्यंत मनस्वी आणि निरागस मुलगी आहे. ती जे काही करते ते मनापासून आणि जीव ओतून. तिचा देवावर खूप विश्वास आहे. श्रद्धेने एखादी गोष्ट मागितली तर ती मिळते अशी तिची धारणा आहे. ती बुजरी, साधी मुलगी असली तरी तिने एखादी गोष्ट ठरवली की ती पूर्णत्वाला नेतेच. कोणतीही गोष्ट साध्य झाल्याशिवाय ईश्वरी प्रयत्न करणं सोडत नाही. ईश्वरीच्या चेहऱ्यावर नेहमी हास्य असतं. ती खूप स्वप्नाळू आहे. सिनेमे बघायला तिला खूप आवडतात. ती शाहरुखची फॅन आहे. त्याचे सिनेमे बघण्यासाठी ती काय वाट्टेल ते करायला तयार असते. तिला असं वाटतं की प्रत्येक नवरा बायकोचं नातं हे शाहरुख आणि त्याच्या सिनेमातल्या हिरॉईनसारखंच असतं. माझ्या स्वभावाच्या पूर्ण वेगळं असं हे पात्र आहे त्यामुळे काम करताना खूप मज्जा येतेय.

**शर्वरी तू मुळची कोल्हापुरची पण मालिकेच्या निमित्ताने नवनव्या भाषा आत्मसात केल्या आहेत त्याविषयी काय सांगशील?**

होय खरं आहे. स्टार प्रवाहच्या 'कुन्या राजाची गं तू रानी' मालिकेच्या निमित्ताने मी आदिवासी भाषा शिकले. त्या भाषेचा वेगळा गोडवा होता. आता 'तू ही रे माझा मितवा' मालिकेत मी इंदौरची भाषा आत्मसात करतेय. नुकतंच आम्ही इंदौरमध्ये शूटिंगही केलं. तिथल्या लोकांसोबत संवाद साधत मी नवनवे शब्द शिकलेय. आमचे निर्माते महेश तागडे देखिल मुळचे इंदौरचे आहेत. त्यामुळे बऱ्याच गोष्टी मी त्यांच्याकडूनही शिकतेय.

**मालिकेतला अर्णव म्हणजेच अभिनेता अभिजीत आमकरसोबत कशी केमिस्ट्री आहे?**

अभिजीत आणि मी पहिल्यांदाच एकत्र काम करतोय. आम्हा दोघांनाही बोलायला प्रचंड आवडतं. त्यामुळे शूटिंगच्या पहिल्याच दिवशी आमची छान मैत्री झालीय. मालिकेत मात्र आम्हा दोघांमध्ये बरीच नोकझोक पाहायला मिळेल. आम्हा दोघांमधले सीन्स खूप छान होत आहेत.

## कार्तिक आर्यन बनला 'जीक्यू लिडींग मॅन-२४'



बॉलिवुडमध्ये कोण कधी टॉपवर जाईल आणि कोण रसातळाला जाईल सांगता येत नाही. हे वर्ष कार्तिक आर्यनचे होते हे नक्की. यामुळेच बॉलिवुडमधला तो या वर्षाचा लिडींग मॅन ठरला आहे. २०२४ चा 'जीक्यू लिडींग मॅन' हा खिताब कार्तिकने पटकावला आहे. हा पुरस्कार या वर्षात सर्वाधिक लोकप्रिय, यशस्वी आणि बॉक्स ऑफिस गाजवणाऱ्या अभिनेत्याला दिला जातो. २०२२ सालचा विजेता अल्लू अर्जुन ठरला होता, तर २०२३ साली या पुरस्कारावर सनी देओलने आपले नाव कोरले होते. अल्लू अर्जुन तेव्हा 'पुष्पा-१' या सिनेमामुळे प्रसिद्धी व लोकप्रियतेच्या शिखरावर होता. पुढच्या वर्षी 'गदर-२' सिनेमामुळे सनी देओलची लोकप्रियता तुफान वाढली होती.

## 'मी नथुराम गोडसे बोलतोय' आता हिंदीत



मराठी रंगभूमीवर गाजलेले 'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटक आता हिंदी रंगभूमीवर नाट्यरसिकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झालं आहे. यासाठी निर्माते परितोष पेंटर, सेजल दिपक पेंटर, लेखक दिग्दर्शक भरत दाभोळकर यांनी पुढाकार घेतला आहे. भरत दाभोळकर लिखित दिग्दर्शित 'नथुराम गोडसे को मरना होगा' या हिंदी नाटकाचे दोन विशेष प्रयोग रविवार १५ डिसेंबरला दुपारी २.३० वा. आणि सायं.५.३० वा. पुण्याच्या नेहरू मेमोरियल सभागृहात रंगणार आहे. प्रदीप दळवी लिखित 'मी नथुराम गोडसे बोलतोय' या मूळ नाटकावर या हिंदी नाटकाचे रूपांतर करण्यात आले आहे. यातील नथुराम गोडसे यांची भूमिका अभिनेता विकास पाटील तर महात्मा गांधी यांची भूमिका अनंत महादेवन यांनी साकारली आहे. या दोघांसोबत भरत दाभोळकर, मोहन आझाद, कौस्तुभ सावरकर, संदीप जंगम, मंगेश देसाई आणि डॉ. दीपा भाजेकर यांनी या नाटकात भूमिका केल्या आहेत.


## ईशा अग्रवालला थायलंडची डॉक्टरेट



मराठीतला 'झोलझाल' आणि हिंदीतला 'कहीं है मेरा प्यार' या चित्रपटांमध्ये झळकलेली अभिनेत्री ईशा अग्रवाल हिने थायलंडमध्ये नुकतीच डॉक्टरेट मिळवली. यासोबतच तिला इंडो एशियन एक्सलन्स पुरस्कारही मिळाला आहे. महाराष्ट्रातल्या छोट्या शहरातून आलेल्या ईशाने अभिनयात आणि मॉडेलिंगमध्ये अद्वितीय कामगिरी केली आहे. तिने 'आर्ट ॲण्ड सोशल मीडिया मॅनेजमेंट' या विषयात पीएचडी केली आहे. याबाबत आनंद व्यक्त करताना ती म्हणाली, माझ्या नावाआधी 'डॉ.' हा शब्द लागला याचा मला खूप आनंद होतोय. डॉक्टरेटचा हा कॉन्वोकेशन समारंभ मी आयुष्यभर विसरू शकणार नाही, असेही तिने स्पष्ट केले. ईशाने काही वेळा स्पर्धक म्हणून तर अनेकदा ज्युरी मेंबर म्हणून अनेक सौंदर्य स्पर्धांमध्ये हजेरी लावली आहे. याच सोहळ्यात तिला अमेरिकेचा प्रतिष्ठीत 'ग्लोबल ह्युमन राइट्स काऊंसिल फॉर पीस सस्टेनेबल डेवलपमेंट' पुरस्कारही प्रदान करण्यात आला. ईशाने मराठी, हिंदीसोबतच 'थिट्टीवासल' या तमीळ सिनेमात आणि तेलुगु वेब-सीरीज 'नीवे' या तेलुगू वेबसीरिजमध्येही काम केले आहे.

## प्रियाचा हॉट अंदाज





मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टी आणि वेबसीरिज गाजवणारी अभिनेत्री प्रिया बापट सोशल मीडियावर नेहमी सक्रिय असते. नुकतेच तिने सोशल मीडियावर गोल्डन गाऊनमधले फोटो शेअर केले आहेत. तिचे हे फोटो चाहत्यांच्या पसंतीस उतरले असून अनेकांनी या फोटोंवर कमेंट्स केल्याचे पाहायला मिळते.

## तोंडात कापसाचा बोळा ठेऊन केले डबिंग



'पुष्पा २'च्या हिंदी डबसाठी अभिनेता अल्लू अर्जुन याने आपला आवाज दिला आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत असून श्रेयसच्या व्हॉइस ओव्हरचे सर्वत्र कौतुक होत आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत पुष्पराज या भूमिकेसाठी डब करताना आपण तोंडात कापूस ठेवून डबिंग केले, असे श्रेयसने सांगितले. श्रेयस म्हणाला, 'पुष्पा'मध्ये अल्लू अर्जुनचे पात्र कधी मद्यपान करताना, तर कधी तंबाखू खाताना दाखवले आहे. जेव्हा अल्लू अर्जुनचे पात्र सिनेमात तंबाखू खाऊन बोलताना दाखवले आहे, तेव्हा मी तोंडात कापूस ठेवून त्या डबिंग केले,' असे तो म्हणाला.

## सनी देओलच्या 'जाट'चा टीजर दाखल



सनी देओलची साऊथच्या चित्रपटांमध्ये खणखणीत एण्ट्री करून देणाऱ्या 'जाट' या सिनेमाची त्याचे चाहते चातकासारखी वाट पाहात आहेत. या सिनेमाचा टीजर नुकताच अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा-२' सिनेमासोबत दाखवला जाऊ लागला आहे. हा टीजर सुरू होतो तेव्हा त्यात तारा सिंहची दणक्यात ॲक्शनबाजी पाहून प्रेक्षकांमध्ये शिट्या आणि टाळ्यांचा गजर होतो. मुळात सनी देओलचा हा सिनेमाही 'पुष्पा-२'च्याच निर्मात्यांनी बनवला आहे. त्यामुळे त्यांनी याच सिनेमासोबत 'जाट'चा टीजर दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठीच हा टीजर त्यांनी यूट्यूब वा सोशल मीडियावर टाकलेला नाहीये. टीजरमध्ये सनी देओल म्हणतो, 'मैं जाट हूं, सर कटने के बाद भी हाथ हथियार नहीं छोड़ता...' तेव्हाच सिनेमा हीट होणार याची कल्पना येते.

## मायलेकी एकाच मालिकेत




बॉलिवूडप्रमाणेच मराठमोळी अभिनेत्री चैत्राली गुप्तेच्या लेकीने आई-वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत 'कलर्स मराठी'वरील 'अशोक मा.मा.' या मालिकेच्या माध्यमातून अभिनयाची वाट धरली आहे. शुभवी गुप्तेने मालिकाविश्वात पदार्पण केलं आहे. तसेच पदार्पणातच तिच्या आईच्या भूमिकेत तिची खऱ्या आयुष्यातील आई चैत्राली गुप्ते आहे. 'अशोक मा.मा.' या मालिकेत शुभवी गुप्ते अशोक सराफ यांच्या नातीची संयमीची भूमिका साकारत आहे. चैत्राली आणि शुभवीची ऑनस्क्रीन धमाल पाहायला प्रेक्षकांनाही मजा येत आहे.आपल्या पहिल्या मालिकेबद्दल बोलताना म्हणाली, 'अशोक मा.मा.' या मालिकेत माझ्या आईच्या भूमिकेत माझी खरी आई आहे. पण ऑनस्क्रीन आणि ऑफस्क्रीन खरं सांगायचं तर काही वेगळं नाही. जसं आम्ही दोघी आमच्या घरी वागतो तसंचं आम्हाला मालिकेत करायचं आहे. माझ्यासाठी ही मालिका म्हणजे नक्कीच एक मोठी संधी आहे.



## 'हॅशटॅग तदेव लग्नम' सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित

मराठीत आता वेगवेगळ्या विषयांवर चित्रपट बनू लागले आहेत. यातच 'हॅशटॅग तदेव लग्नम' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झालाय. टीझरनंतर आता ट्रेलर पाहून या चित्रपटाबद्दलची प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. 'लग्न' संस्थेबाबत आधुनिक काळाचे विचार हलक्याफुलक्या आणि मजेशीर पद्धतीने या चित्रपटात मांडण्यात आलेले ट्रेलरमध्ये जाणवते. या सिनेमाच्या निमित्ताने सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान ही जोडी पहिल्यांदाच पडद्यावर झळकणार आहे. याव्यतिरिक्त यात प्रदीप वेलणकर, मानसी मागिकर, संजय खापरे, शर्मिष्ठा राऊत यांच्याही भूमिका आहेत. ट्रेलरमध्ये अथश्री आणि गायत्री ही दोन परस्पर विरोधी व्यक्तिमत्वं त्यांच्या लग्नासाठी एकमेकांना पहिल्यांदा भेटताना दिसतात. या दरम्यान काही गंमतीशीर घटना घडतात. दोघांचे विचार ते एकमेकांसोबत शेअर करत असतानाच त्यांच्या आयुष्यातील काही रहस्येही समोर येत आहेत. त्यामुळे आनंद गोखले दिग्दर्शित या सिनेमात धमाल आहेच तसेच काही ट्विस्टही आहेत. हा सिनेमा २० डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१०९६



**आडवे शब्द –**

१. सुगंधी ४. सूर्य ६. विलक्षण, अलौकिक ९. सपशेल (खोटे) ११. गंभीर चूक १२. शंभर सेंटीमीटर १३. मेलेला १४. निखाऱ्यावर भाजलेली भाकरी १६. प्रत्येक १७. समुद्राच्या लाटांचा आवाज १८. तीव्र गरज २०. मृग २१. मेंदू २२. परंपरा २३. खीर, प्रसादाची खीर २५. दुसरा २६. धाक २८. मृदू, सौम्य ३०. उष्ण, कढत ३१. पहाटेची देवळातली आरती ३३. झाडाचा खालचा भाग ३५. सोबत ३६. वरिष्ठांना दिलेली भेटवस्तू ३९. आप्त ४१. नाचणी ४३. व्यर्थ, फोल ४४. रखवाली ४६. गुरांचे हळूहळू जेवणे ४८. धडाडी ५०. श्रीराम ५२. चिडचिड ५५. वितरण ५६. ताकद ५८. कमी वेळात ६१. संबंध तोडणे, दूर लोटणे ६३. उपाय ६४. सुतारकामाचे एक अवजार ६६. बरोबर ६७. मलीन ६९. ध्रुवबाळाला देवाने दिलेली गोष्ट ७१. संवत्सर ७२. निर्मिती ७४. बारीक तुकडा ७५. कमळ ७६. धीर, बळ, उत्साह ७७. सूक्ष्म तपशील ७९. रक्तवाहिनी ८१. स्तंभ ८४. नांगरलेली जमीन साफ करण्याचे साधन ८५. सुभाषित ८८. नवनाथांपैकी एक ९१. बक पक्षी ९२. तंबाखूचे चूर्ण ९४. गोळा ९६. सुंदर ९७. हात १००. या बाजूला, येथे १०१. न्यारा, निराळा १०२. तोकडा १०३. नाना प्रकारचे १०४. झलक १०५. बारा इंच १०६. आईस्क्रीम आणि केक एकत्र असलेली डिश १०७. छंद १०८. टणटणी वनस्पतीचे दुसरे नाव

**उभे शब्द –**

१. कमी दर्जाचे २. मतभेद ३. सदरा ४. टंचाईमुळे विजेचे लोडशेडिंग ५. चिकार ६. सहजी न मिळणारे ७. मोठा हातोडा ८. जेवणाचे ताट, थाळ ९. शस्त्राची तीक्ष्ण बाजू १०. कन्या, पुत्री ११. विनोदी नाटक, फार्स १५. करुणा १७. संत तुकारामांचे अभंग १९. सत्त्व २०. सहस्र २१. डरपोक २२. महादेव २३. कट्टा २४. काणा, तिरळा २५. दोन नद्यांमधील प्रदेश २७. चौथरा, ओटा २९. पृथ्वी ३०. नजरचूक ३१. कलाकुसरीच्या वस्तू तयार करणारा ३२. देवदर्शनासाठी प्रवास ३४. समुद्रजलापासून मीठ बनवण्याची जागा ३७. वार्धक्य ३८. खूप, भरपूर ४०. तांब्या ४२. दूत हालचाली करणारा ४५. महाग ४७. संधीला मुकलेला ४९. स्पष्टवक्ता ५१. लक्ष्मीचे वाहन असणारा दिवाभीत पक्षी ५३. कपोल ५४. शंका, संशय; चणचण, टंचाई ५७. अजाणता ५९. त्वचेचा रंग ६०. जाणकार चाहता ६१. आकाश ६२. जिव्हा, जीभ ६३. बरोबरीचा ६४. वृद्धी ६५. बेचव ६७. पाठीचा कणा ६८. संतान ६९. लगामाची दोरी ७०. औषधालय ७१. अयोध्येची नदी ७३. चेहरा ७४. सुताराचे लाकूड कापण्याचे साधन ७७. लहान मूल ७८. समुद्रमंथनासाठी देव-दानवांनी वापरलेला नाग ८०. फळाच्या अपेक्षेने केलेले सत्कर्म ८२. फजिती ८३. चिंचेची चव ८४. कुटुंबात चालत आलेल्या धार्मिक प्रथा ८६. ताटातूट ८७. मनोहर ८९. खाऊन संपवणे ९०. लेप, स्तर ९३. आयत्या वेळी पळून जाणारा ९५. वागणे ९८. झुबका, गुच्छ ९९. आवेश १०१. साडेतीन १०२. याप्रमाणे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०९५ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. बुजगावणे ५. समारंभ ८. ढाबा ११. न्यूटन १२. कमकुवत १४. डंका १६. लंगडा १७. मोका १८. दावानल १९. मत २०. झगमगाट २३. पथक २५. लोणी २६. नार २७. रागी २८. यात्रेकरू ३२. शोक ३४. वानवा ३६. ढकलाढकली ३९. वाकसळ ४२. आयुध ४४. ढवळणे ४५. मनसोक्त ४६. पादाक्रांत ४८. गगनजाई ५०. खाशा ५१. पाय ५२. तीर ५३. वारी ५४. तळी उचलणे ५६. मालमत्ता ५७. नयन ५९. खडतर ६०. विषवल्ली ६१. पीळ ६३. कपी ६५. कप ६६. गळ ६७. दंतमंजन ७०. तरफदारी ७३. मोजदाद ७५. दिवा ७६. वराह ७८. मल्ल ७९. घडा ८१. वरण ८२. काहूर ८४. वनराज ८५. माकड ८७. सरोद ८९. रड ९०. दैन्य ९१. रमण ९३. रस्सा ९४. जनक ९६. नृत्य ९७. अभिजन ९८. बोका ९९. टांगा १००. शिसा १०२. पाम १०३. ताट १०४. मोकळीक १०६. रहदारी १०८. धरणीकंप १०९. खंबीर ११०. टक्का

**उभे शब्द :** १. बुटका २. जन ३. वहिवाट ४. श्रम ५. सवत ६. मात ७. भडंग ९. बालंट १०. खडाजंगी ११. न्यूमोनिया १२. कलप १३. कुमक १५. कामना २०. झणी २१. गारवा २२. झोक २४. थबकणे २५. लोकवान २७. रावा २९. त्रेतायुग ३०. रूढ ३१. पुलाव ३३. आसक्त ३५. नर्मदा ३७. कढई ३८. ढळढळीत ४०. कसोटी ४१. कातरवेळ ४२. आगमन ४३. धनवान ४५. मशालजी ४६. पायमल्ली ४७. क्रांती ४९. जारी ५०. नाच ५१. पालवणे ५४. तडक ५५. उरक ५६. माष ५८. यकृत ६०. विपदा ६१. पीळदार ६२. ताजवा ६४. पीत ६५. कफल्लक ६६. गजवदन ६७. दंडकारण्य ६८. मंदिर ६९. दरारा ७१. रममाण ७२. रीघ ७४. दणका ७६. वन ७७. हजरजवाबी ८०. डास ८३. हूड ८४. वन्य ८६. डरकाळी ८८. रोजगार ९०. दैत्य ९२. मन ९५. कशिदा ९६. नृमणी ९७. अभिजन ९८. बोकड १०१. सारी १०२. पार १०३. ताप १०५. कट १०७. हल्ला

## बांगलादेशकडून भारतीय सीमेवर तुर्कीच्या ड्रोनने गस्त



■ नवी दिल्ली

**बांगलादेशाच्या** भारतीय सीमेवर तुर्की देशात निर्मिती करण्यात आलेले ड्रोन दिसल्याने सीमेवरील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. या प्रकरणाची चौकशी करणार असल्याचे भारतीय लष्कराने म्हटले आहे.

बांगलादेशाच्या जवळ असलेल्या भारतीय सीमेवर तुर्कीमध्ये उत्पादित करण्यात आलेले बयरख्तार टीबी२ प्रकाराचे मानवरहित ड्रोन आढळले. पश्चिम बंगालजवळच्या आकाशात हे ड्रोन आढळल्याची माहिती गुप्तहेर संस्थांनी दिली आहे. या ड्रोनचे संचालन बांगलादेशच्या ६७ आर्मिच्या बटालियनकडून केले जात आहे. संरक्षणाच्या दृष्टीने हे ड्रोन उडवले गेल्याचे बांगलादेशने म्हटले आहे. भारताने म्हटले आहे की, अशा प्रकारच्या अत्याधुनिक ड्रोनच्या भारतीय सीमेजवळील हालचालींकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शेख हसीना यांचे सरकार उलथवून टाकल्यानंतर बांगलादेशात अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले. या सरकारच्या काळात बांगलादेशातील हिंदूवरचे अत्याचार वाढले आहेत. त्याच वेळेस भारतीय सीमेवर बांगलादेशकडून उडवण्यात आलेल्या ड्रोनमुळे दोन्ही देशांमध्ये तणाव वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## श्वानांना कारच्या टपावरुन फिरवणाऱ्या व्यक्तीला अटक

■ बंगळुरु

**बंगळुरुमध्ये** आपल्या कारच्या टपावर तीन श्वानांना बसवून कारमधील टेपवर मोठ्या आवाजात गाणी ऐकत जाणाऱ्या एका वाहनचालकाला पोलिसांनी अटक केली. या प्रकाराचा व्हिडीओ समाजमाध्यमावरही व्हायरल झाला आहे.

बंगळुरुमधील रस्त्यावर काल रात्री एक युवक आपल्या तीन श्वानांना कारच्या टपावर बसवून चालला होता. यावेळी कुत्र्यांच्या सुरक्षेसाठी कोणतेही उपकरण वापरण्यात आले नव्हते. तो कारमध्ये मोठ्या आवाजात गाणीही ऐकत होता.

रस्त्यावरील इतर कारचालकांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला असता त्याने त्यांनाही शिवीगाळ केली. हा व्हिडीओ समाजमाध्यमावर आल्यानंतर प्राणीप्रेमींनी त्याच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. त्याच्या गाडीवर प्रेसचा स्टिकरही होता.

## मोदींनी मणिपूरला भेट द्यावी प्रदेश काँग्रेसची विनंती



■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी मणिपूरला भेट द्यावी, अशी विनंती प्रदेश काँग्रेसने आज त्यांना केली. मणिपूर प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कीशम मेघचंद्र सिंह यांच्यासमवेत राज्यातील काँग्रेस नेत्यांनी पंतप्रधान कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी मणिपूरच्या जनतेच्या वतीने पंतप्रधानांना निवेदन देण्यात आले आहे.

मणिपूर काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान कार्यालयाला भेट देऊन निवेदन दिले. मात्र, त्यांची पंतप्रधान मोदी यांची भेट झाली नाही. मणिपूरमध्ये सध्या सुरू असलेल्या हिंसाचारावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी राज्याच्या नेत्यांशी संवाद साधण्याचे आवाहन या निवेदनात करण्यात आले आहे.

काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ जंतरमंतर येथे धरणे आंदोलन करण्यासाठी आले होते. मात्र, प्रशासनाने त्यांना निदर्शने करण्याची परवानगी नाकारली. प्रदेशाध्यक्ष सिंह म्हणाले की, प्रशासनाने आंदोलनाला परवानगी नाकारली असली, तरीही आमचा लढा सुरुच राहणार आहे. पंतप्रधानांनी मणिपूरला भेट द्यावी ही लोकांचीच मागणी आहे. राज्यातील भाजपासह सर्व राजकीय पक्षांची हीच मागणी आहे.

## आंदोलक शेतकऱ्यांवर अश्रूधुराचा मारा ७ जखमी! तूर्त माघार! उद्या पुन्हा कूच

पान १ वरून

जाईल, असा इशारा दिला.

पंजाब आणि हरियाणाच्या वेशींवर गेले सुमारे दहा महिने ठाण मांडून बसलेल्या शेतकऱ्यांनी आज दिल्लीकडे कूच करण्याचा प्रयत्न केला. १०१ शेतकऱ्यांचा जत्था दिल्लीच्या दिशेने निघाला होता. मात्र शेतकऱ्यांना रोखण्यासाठी दिल्लीच्या हरियाणा सीमेला जोडणाऱ्या सिंधू आणि बहादूरगड सीमा संवेदनशील परिसर घोषित करण्यात आला होता. पूर्व दिल्लीतील गाजीपूर, नोएडा आणि चिल्ला सीमांवरही कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. डंडेहरी, लोहगढ, मानकपूर, डडीयाना, बडी घेल, लहारसा, कालू माजरा, देवीनगर, सुल्तानपूर, सड्डोपूर आणि काकडू या सीमाभागातील गावांतील इंटरनेट सेवा दुपारी १२ वाजल्यापासून बंद करण्यात आली.

पिकांना हमी भाव (एमएसपी) देण्याचा कायदा करावा, १९९७ सालापासून जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांना १० टक्के अतिरिक्त विकसित भूखंड देणे, नव्या भूसंपादन कायद्यानुसार संपादित केलेल्या जमिनीच्या बाजार भावाच्या चार पट अधिक मोबदला द्या, पूर्ण कर्जमाफी, शेतकऱ्यांना महिना १०,००० रुपये, शेतकऱ्यांवरील खटले मागे घ्या, भूमिहिन शेतकऱ्यांना रोजगार या प्रमुख मागण्यांसह एकूण दहा मागण्यांसाठी शेतकरी गेले १०-११ महिने आंदोलन करीत आहेत.

## रेल्वेमार्गासाठी संपादित क्षेत्रात शेतकऱ्यांनी पेरणी करु नये

**उपविभागीय अधिकारी पत्रक**

■ धुळे

**प्रस्तावित** बोरविहीर (धुळे) ते नरडाणा रेल्वे मार्गासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीमधील क्षेत्र संपादित झालेले आहे. त्या संपादित क्षेत्रात शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारच्या पिकाची पेरणी करु नये. तसेच कोणत्याही प्रकारचे बांधकामे व नविन झाडे लावू नये, असे शरद मंडलिक सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

प्रस्तावित बोरविहीर (धुळे) ते नरडाणा रेल्वे मार्गासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीमधील क्षेत्र संपादित झालेले आहे. त्या शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित क्षेत्राचा बहुतांश मोबदला अदा करण्यात आला आहे.

भुसंपादन रेल्वे (सुधारणा) अधिनियम २००८ चे कलम २०(ई) अन्वये संपादित क्षेत्र रेल्वे प्रशासनाकडे हस्तांतरीत झालेले आहे. त्यानुसार रेल्वे मार्गाचे काम सुरू झालेले आहे. त्या अनुषंगाने संपादित क्षेत्रात काम करण्यास व शासकीय कामात अडथळा निर्माण करण्याचा कुणी प्रयत्न केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणेत येईल, याची सर्व संपादित क्षेत्रातील जमीन धारकांनी नोंद घ्यावी, असेही उपविभागीय अधिकारी मंडलिक यांनी कळविले आहे.

**जाहीर सूचना**

महाराष्ट्र पोलीस को-ऑप. हौसिंग फेडरेशन लि. या संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की, दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी येथे प्रकल्पाचे काम चालू आहे. परंतु बऱ्याच सभासदांचा राहण्याचा पत्ता व फोन नंबर बदलल्यामुळे संपर्क साधता येत नाही. सदरची बाब लक्षात घेता या जाहिरातीद्वारे सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या कार्यालयाशी प्रत्यक्षात भेट द्यावी किंवा ईमेल mpchfl@gmail.com / info@mpchfl.com वर आपला राहण्याचा पत्ता, पॅनकार्ड, आधारकार्ड, व्हाट्सअप नंबर व ईमेल आयडी देण्यात यावा ही विनंती.

**कार्यालयीन पत्ता :** दादासाहेब गायकवाड नगर, गेट नं ८, कला विद्यालय शाळेसमोर, मालवणी मालाड (प.), मुंबई - ४०००९५.

## एकनाथ शिंदेशिवाय शपथविधी घेण्याचा प्लॅन भाजपाकडे आधीच तयार होता

■ मुंबई

**स्पष्ट** बहुमत मिळूनदेखील महायुतीला सरकार स्थापनेचा दावा करण्यासाठी दहा-बारा दिवस लागले. याला एकनाश शिंदे कारणीभूत ठरले. मात्र शिंदेशिवाय सरकार स्थापन करण्याचा प्लॅन भाजपाकडे आधीच तयार होता, असा दावा शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केला.

आपल्या आमदारांच्या जोरावर शिंदे यांनी भाजपाची अडवणूक केली. त्यामुळे महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपदावरून रस्सीखेच सुरू होती. पण शिंदेंचा अडेलतट्टूपणा सुरूच राहिला

**संजय राऊत यांचा दावा**



असता तर त्यांना वगळून पुढे जाण्याचा प्लॅन भाजपाकडे तयार होता, महायुती सरकारमध्ये काही आमचीही माणसे आहेत.

त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे मी हे ठामपणे सांगत आहे, असे राऊत म्हणाले. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी काही नव्या योजना जाहीर केल्या. महाराष्ट्राच्या प्रगतीचे नवे व्हीजन लोकांसमोर मांडले. पण त्यांचे अडेलतट्टू सहकारी त्यांना विनाअडथळा काम करू देतील का, हे लवकरच कळेल, असा सूचक टोलाही राऊत यांनी लगावला.

## बाबरी मशीद प्रकरणात न्यायाची थट्टा मात्र खटल्याची पाच पाने आशेची किरणे

पान १ वरून

की, संपूर्ण देशात मशिदी आणि दर्ग्यांच्या विरोधात खटले दाखल केले जात आहेत. याला प्रतिबंध करण्याचा, वाद मिटवण्याचा एकमेव मार्ग हा बाबरी निकाल आहे. या निकालात प्रार्थनास्थळे कायद्याचे समर्थन केले आहे. त्यामुळे बाबरी खटल्याचा निकाल प्रत्येक जिल्हा आणि उच्च न्यायालयासमोर वाचायला हवा. कारण त्या निकालातील पाच पाने सर्वोच्च न्यायालयाच्या कायद्याची घोषणाच आहे. ती सर्वांसाठी बंधनकारक आहे. या निकालात सांगितल्याप्रमाणे जर प्रार्थनास्थळांचा कायदा लागू झाला तर हे प्रकार सहजपणे थांबतील.

बाबरी मशिदीच्या जागेवर मंदिर बांधण्याची परवानगी देण्याच्या निकालावर मात्र न्यायमूर्ती नरिमन यांनी टीका केली. ते म्हणाले की, या प्रकरणात न्यायाची थट्टा झाली आहे. धर्मनिरपेक्षतेला तिचा हक्क देण्यात आला नाही.

१९९२ मध्ये बाबरी मशीद पाडण्याचा कट रचल्याचा आरोप असलेल्या भाजपाच्या राजकीय दिग्गजांची सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतरही ट्रायल कोर्टाने निर्दोष मुक्तता कशी केली आणि सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती या नात्याने त्यांनी सुमारे २५ वर्षे निष्क्रिय असलेल्या खटल्याची सुनावणी पुन्हा सुरू करण्याचे आदेश कसे दिले याबाबतही नरिमन यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, एवढे होऊनही विशेष सीबीआय न्यायाधीश सुरेंद्र यादव यांनी खटला चालवला आणि अखेरीस सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. पुढे सेवानिवृत्तीनंतर त्यांना उत्तर प्रदेशमध्ये उपलोकायुक्त बनवण्यात आले. या देशाची हीच कहाणी आहे.

**मध्य रेल्वे**

**एक्सल बॉक्सेसची सफाई**

**खुली ई-निविदा सूचना क्र.**

**१) पीआर-डब्ल्यूएस-एबी-२४-२५-६७९**

कामाचे नाव: एक्सल बॉक्स आणि गोलाकार रोलर बेअरिंग उतरविणे, एक्सल बॉक्स असेम्ब्ली कम्पोनंट्सची सफाई आणि आयसीएफ कोचेसच्या ठरवून दिलेल्या ठिकाणांवर रचून ठेवणे आणि इतर रोलिंग स्टॉक्स व्हील संचांचेही तसेच करण्याचे काम. **अंदाजित किंमत - रु. १३५१४७८/-, निविदा अर्जाची किंमत: शुन्य, ईएमडी: रु. २७०००/-.** पूर्तता कालावधी: - १२ महिने. वरील ई-निविदा सादरीकरणाचा वेळ आणि दिनांक २५.१२.२०२४ रोजी १७.०० वाजेपर्यंत आहे. ई-निविदेचे संपूर्ण तपशील अधिकृत रेल्वे वेबसाईट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहेत.

मु. का. व्य., परेल 581

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

## खुर्ची क्रमांक २२२! काँग्रेसच्या खासदाराचे आसन

पान १ वरून

पाहिजे. नोटांचे बंडल राज्यसभेच्या सभागृहात येते ही गंभीर बाब आहे. राज्यसभेत या विषयावरून प्रचंड गदारोळ झाला. सभापती धनखड यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती घोषित केली आणि आज दिवसभराचे कामकाज या गदारोळातच समाप्त झाले. अभिषेक मनू सिंघवी हे तेलंगणाहून नियुक्त झालेले काँग्रेसचे खासदार आहेत. २०२४ ते २०२६ हा त्यांचा कार्यकाळ आहे. ते अत्यंत प्रसिद्ध वकील आहेत. काँग्रेसने आरोप केला की, अदानी प्रकरणावरून लक्ष हटविण्यासाठी भाजपाने हे नवे कुभांड रचले आहे.

**फॉर्म बी**

**जाहीर उद्घोषणा**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**ॲडव्हान्टेज ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **ॲडव्हान्टेज ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | १० ऑगस्ट, २०२४ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U05121MH2004PTC199195 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ४१४/ए-विंग, ४था मजला, एक्सप्रेस झोन, ऑफ प.द्रु. महामार्ग, मालाड (पूर्व), मुंबई ४०००९७ महाराष्ट्र |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | २७ नोव्हेंबर, २०२४ (परिसमापकांना दि. ०५ डिसेंबर, २०२४ रोजी आदेश प्राप्त) |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | २७ नोव्हेंबर, २०२४ (परिसमापकांना दि. ०५ डिसेंबर, २०२४ रोजी आदेश प्राप्त) |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | कमल कुमार जदवानी IBBI/IPA-001/IP-P-02786/2022-2023/14259 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | **पत्ता:** सदनिका क्र. ६०५, विंग-बी, सद्गुरू कॉम्प्लेक्स II (ए-बी), फिल्म सिटी रोड, गोरेगाव (पूर्व), सॅटेलाईट टॉवरला संलग्न, मुंबई उपनगर, महाराष्ट्र ४०००६३ ईमेल: kamaljadwani@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | **पत्ता:** सदनिका क्र. ६०५, विंग-बी, सद्गुरू कॉम्प्लेक्स II (ए-बी), फिल्म सिटी रोड, गोरेगाव (पूर्व), सॅटेलाईट टॉवरला संलग्न, मुंबई उपनगर, महाराष्ट्र ४०००६३ ईमेल: ip.advantageoverseas@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | ४ जानेवारी, २०२५ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ यांनी **दि. २७ नोव्हेंबर, २०२४** रोजी **ॲडव्हान्टेज ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेड**चे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले. (परिसमापकास दि. ०५ डिसेंबर, २०२४ रोजी ईमेलद्वारे आदेश प्राप्त झाला.)

**ॲडव्हान्टेज ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेड**च्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **दि. ०४ जानेवारी, २०२५** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

जर भागधारकांनी त्यांचे दावे परिसमापन प्रक्रियेदरम्यान सादर न केल्यास, अशा भागधारकाद्वारे कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेदरम्यान दाखल केलेले दावे भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ अन्वये कलम ३८ अन्वये दाखल केल्याचे मानण्यात येईल.

**कमल कुमार जदवानी**

ॲडव्हान्टेज ओव्हरसीज प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक

IBBI/IPA-001/IP-P-02786/2022-2023/14259

दिनांक: ०६ डिसेंबर, २०२४

ठिकाण: मुंबई

नवा काळ




नवा काळ विजय

उद्या वाचा


बांगलादेशात हिंदू धोक्यात!



'एफबीआय'च्या संचालकपदी भारतीय वंशाचे कश पटेल




हो, मी 'चिल गाय'आहे...



## थोडक्यात...

### उबाठाचे माजी नगरसेवक पेडणेकर शिंदे गटात जाणार

**मुंबई -** वर्सोवा येथून सलग तीन वेळा नगरसेवक राहिलेले उबाठा पक्षाचे माजी नगरसेवक राजू पेडणेकर शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. त्यांनी विधानसभा निवडणुकीत वर्सोवामधून बंडखोरी करून अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. राजू पेडणेकर म्हणाले की, माझी भूमिका ठरवण्यासाठी मी कार्यकर्त्यांशी आणि जनतेशी चर्चा केली. त्यांचा आग्रह होता की, हिंदुत्ववादी पक्ष म्हणून शिंदे गटात प्रवेश करावा. त्यामुळे मी मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर शिंदे गटात प्रवेश करणार आहे.

### दादर रेल्वे स्थानकाबाहेर भीम आर्मीचे आंदोलन

**मुंबई -** भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज दुपारी दादर रेल्वे स्थानकाला बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी भीम आर्मीच्या कार्यकर्त्यांनी या स्थानकाच्या परिसरात आंदोलन केले. या आंदोलनात कार्यकर्त्यांनी फलक घेऊन जोरदार घोषणा दिल्या. परिणामी दादर स्थानक परिसरात गोंधळ उडाल्याने पोलिसांनी या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

### कडाक्याच्या थंडीमुळे ९ वाजता शाळा

**छत्रपती संभाजीनगर -** जिल्ह्यात सध्या थंडीचा कडाका वाढल्याने प्राथमिक इयत्तांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेऊन शिक्षणाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शाळांना चौथी पर्यंतचे वर्ग सकाळी नऊ वाजता किंवा त्यानंतर भरवण्याचे आदेश दिले आहेत. कडाक्याच्या थंडीत सकाळी लवकर लहान मुलांना शाळेत पाठवणे कठीण होते. त्यामुळे थंडीच्या दिवसांत शाळा निदान एक तास उशिरा भरवावी, अशी मागणी केली होती. त्याची दखल घेत शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी काल हे आदेश दिले.

### कनौजमध्ये अपघात ८ ठार! ४० जखमी

**कनौज -** लखनौ-दिल्ली महामार्गावर कनौज इथे झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला असून, ४० जण जखमी झाले आहेत. रस्त्यावर उभ्या असलेल्या एका टँकरला बसने धडक दिल्याने हा अपघात झाला. या अपघातात दोन्ही वाहने उलटली. त्यात बसमधील प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. आगरा-लखनौ एक्स्प्रेस वेवर सकरावा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मिश्राबाद गावाजवळ हा अपघात झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना सैफई येथील एम्स रुग्णालयात दाखल केले.

### भिवंडीत अग्नितांडव गोदाम जळून खाक

**भिवंडी -** भिवंडी तालुक्यातील राहणाळ येथे प्रेरणा कॉम्प्लेक्स येथील गोदामाला भीषण आग लागली. गोदामात इलेक्ट्रॉनिक



सामान असल्याने आगीचा भडका उडाला. या घटनेने परिसरातील लोकांची एकच धावाधाव झाली. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. या आगीत संपूर्ण गोदाम जळून खाक झाले. गोदामात मोठ्या प्रमाणात हायड्रोलिक ऑईल, प्लास्टिकचे सामान आणि रसायने ठेवण्यात आले होते. या गोदामाला नेमकी आग कशी लागली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवाला राज्यपाल आणि मंत्र्यांचे अभिवादन



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह चैत्यभूमी मुंबई येथे डॉ. आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पचक्र वाहून अभिवादन केले. यावेळी त्रिशरण बुद्ध वंदना करण्यात आली. यावेळी राज्यपालांच्या हस्ते माजी खासदार व लेखक डॉ. नरेंद्र जाधव यांनी लिहिलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

## महायुतीच्या शपथविधीत ढिसाळपणा! गुजरातचे शिळे पाणी दिले! शिंदे गटाचा आरोप

■ मुंबई

**महायुतीचा** शपथविधी सोहळा काल पार पडला. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या सोहळ्यात देशभरातून मान्यवर उपस्थित होते. मात्र, या सोहळ्यात अनेक त्रुटी आणि नियोजनात ढिसाळपणा असल्याचा आरोप शिंदे गटाने केला. काही निमंत्रितांनी तक्रार केली की, त्यांना गुजरातवरून आणलेल्या मुदत संपलेल्या शिळ्या पाण्याच्या बाटल्या



दिल्या. त्यांनी याबाबत आयोजकांकडे तक्रार केली.

निमंत्रितांना राजकोट येथील 'मॅनिफेस्ट द चेंज' या ट्रेट्रापॅक कंपनीच्या पाण्याच्या बाटल्या दिल्या होत्या. या अर्धा लीटर पाण्याच्या बाटलीची किंमत ६९ रुपये होती. मात्र, या बॉटल कालबाह्य झाल्या होत्या. हे टेट्रापॅक ५ एप्रिल २०२२ मध्ये पॅक केले होते. त्याची मुदत ही १९ ऑक्टोबर २०२४ ला संपली होती. या शिळ्या पाण्याबद्दल अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही जणांनी तर ही बाब आयोजकांच्या निदर्शनास आणून दिली व कारवाई करण्याची मागणी केली.

## शीतपेयांवर ३५ टक्के जीएसटीचा प्रस्ताव तयार




■ नवी दिल्ली

**मानवी** आरोग्याला अपाय करणाऱ्या तंबाखूजन्य उत्पादनांवर आता २८ टक्क्यांऐवजी जादा जीएसटी म्हणजेच वस्तू व सेवा कर आकारण्याचा प्रस्ताव तयार झाला आहे. शीतपेयांनाही या ३५ टक्क्यांच्या नव्या कर टप्प्यामध्ये आणण्यात येणार आहे. या प्रस्तावाला जीएसटी परिषदेने हिरवा कंदील दाखविला तर नव्या वर्षाच्या आरंभापासून त्याची अंमलबजावणी सुरू होईल.

बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील वस्तू व सेवा कराच्या मंत्रिगटाने तशा आशयाची शिफारस जीएसटी परिषदेला केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली राजस्थानातील जैसलमेर येथे २१ डिसेंबर रोजी जीएसटी परिषदेची बैठक होणार आहे. या परिषदेच्या कार्यपटलावर हा विषय समाविष्ट करण्यात येणार आहे. याखेरीज मंत्रिगटाने केलेल्या शिफारशीनुसार चामड्याच्या बॅग्ज, सौंदर्य प्रसाधने, घड्याळे आणि चप्पल आदी चैनीच्या वस्तूंवर सध्या १८ टक्के जीएसटी आकारला जातो. तो वाढवून २८ टक्के करण्याचा प्रस्तावावरही निर्णय अपेक्षित आहे. सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी दिल्लीत मंत्रिगटाची बैठक झाली. या बैठकीत एकूण १४८ वस्तूंवरील जीएसटी कर टप्प्यांच्या बदलाविषयी प्रस्ताव तयार करण्यात आला.

## मारकडवाडीत ईव्हीएमविरोधात मोर्चा राहुल गांधी सहभागी होणार

■ सोलापूर

**विरोधक** राज्यभरात ईव्हीएम मशीनवर आक्षेप नोंदवताना दिसत आहेत. त्यातच काही दिवसांपूर्वी सोलापुरातील मारकडवाडीत बॅलेट पेपरवर चाचणी मतदान करण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला होता. मात्र प्रशासनाकडून ही मागणी फेटाळण्यात आली आणि पोलिसांचा दबाव आणून मतदान बंद पाडले. आता मारकडवाडीतून गावकरी ईव्हीएम विरोधात मोर्चा काढणार आहेत. या मोर्चात राहुल गांधी सहभागी होणार आहेत, अशी माहिती शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी दिली. उत्तम जानकर म्हणाले, सोलापुरातील मारकडवाडीतून एक मोर्चा काढला जाणार आहे. हा मोर्चा ईव्हीएम विरोधात असणार आहे. त्याची तारीख लवकरच सांगू. या मोर्चात काँग्रेस नेते राहुल गांधी उपस्थित राहणार आहेत.

## भाजपाचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे दीर्घ आजाराने निधन

■ नाशिक

**भाजपाचे** ज्येष्ठ नेते मुधकर पिचड यांचे आज संध्याकाळी वयाच्या ८४व्या वर्षी निधन झाले. त्यांना १५ ऑक्टोबरला अहमदनगरच्या राजूर येथील राहत्या घरी ब्रेनस्ट्रोकचा झटका आला होता. तेव्हापासून त्यांच्यावर नाशिकच्या नाइन पल्स रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

त्यांनी १९८० ते २००४ या काळात अहमदनगरच्या अकोले विधानसभा मतदारसंघातून विधानसभेचे आमदार म्हणून सलग सात वेळा काम केले होते. मार्च १९९५ ते जुलै १९९९ या काळात ते विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. मधुकर पिचड राजकीय कारकिर्दीच्या



सुरुवातीपासून राष्ट्रवादीचे सदस्य होते. परंतु २०१९ मध्ये त्यांनी त्यांचा मुलगा वैभव पिचड यांच्यासह भाजपात प्रवेश केला. त्यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष म्हणून देखील काम पाहिले होते.

## महाकुंभचे १३ डिसेंबरला पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

■ प्रयागराज

**प्रयागराज** येथे होणाऱ्या महाकुंभ २०२५ चे अधिकृत उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १३ डिसेंबरला होणार आहे. पंतप्रधानांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर उद्या मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ महाकुंभच्या तयारीचा आढावा घेणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते काही कक्षांचे उद्घाटनही होणार आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उद्याच्या भेटीत ते स्वच्छ व हरित महाकुंभ या संकल्पनेसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध कामांचा आढावा घेणार आहेत. त्यामध्ये रस्त्यांचे नूतनीकरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. प्रयागराज विकास प्राधिकरण हे काम करणार असून, सार्वजनिक बांधकाम खाते सौंदर्यीकरणाचे तसेच दिवाबत्तीच्या सोयीचे काम करणार आहे. प्रयागराज महानगरपालिका शहरात विविध स्वागत कमानी उभारणार असून, योगी आदित्यनाथ हे महाकुंभ नगरच्या तयारीचा आढावा घेतील.

## आयआयटी खरगपूर संचालकांच्या विरोधात शिक्षकांचे मोठे आंदोलन

**नियमबाह्य नियुक्त्या केल्याचा आरोप**

■ खरगपूर

**आयआयटी** खरगपूरचे संचालक व्हि. के. तिवारी यांच्या कारभाराच्या विरोधात आयआयटी मधील शिक्षकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी संस्थेच्या परिसरात मोठे आंदोलन केले. संचालक नियमबाह्य नियुक्त्या करत असून, शिक्षकांना त्रास देण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. संचालकांनी शिक्षक संघटनेने शिक्षणमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रावर सह्या करणाऱ्या ८६ शिक्षकांना नोटीसा बजावल्या आहेत.

आयआयटीचे संचालक व शिक्षकांमधील संघर्ष यावर्षीच्या सप्टेंबर महिन्यात तीव्र झाला.




आयआयटी खरगपूरचे संचालक शिक्षक निवड प्रक्रियेत काहींना झुकते माप तर काहींविरोधात सूड बुद्धीने वागत असल्याचे पत्र आयआयटी शिक्षक संघटनेने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पाठवले. संचालकांच्या धोरणांमुळे काही शिक्षकांवर अन्याय केला जात असून, अनेक महत्त्वाच्या पदावर नियमबाह्य नियुक्त्या करत असल्याचे या पत्रात म्हटले होते.

## अदानी लाचखोरी प्रकरणावरून लोकसभेत कामकाज पुन्हा तहकूब

■ नवी दिल्ली

**अदानी** लाचखोरी प्रकरणी विरोधी पक्षांनी चौकशीचा मुद्दा लावून धरला. त्याला परवानगी न मिळाल्यामुळे आजही लोकसभेत शून्य प्रहरात मोठा गोंधळ झाला. अखेर लोकसभा सभापतींनी कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केले.

लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनाचा आजचा दिवसही अदानी प्रश्नी चौकशीच्या मागणीने गाजला. विरोधी सदस्यांनी हातात संविधानाची प्रत घेऊनच लोकसभेत प्रवेश केला. शून्य प्रहरात सभापतींसमोर अदानी लाचखोरी प्रकरणी चौकशीची मागणी करण्यात आली. त्याला सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने गोंधळ झाला. त्यामुळे लोकसभेचे कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. त्यानंतर कामकाज पुन्हा सुरू झाल्यावरही गोंधळ झाल्याने शेवटी लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

## मुंबई-बडोदा महामार्गाचे काम प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी बंद पाडले

■ ठाणे

**मुंबई-बडोदा** महामार्गाच्या प्रकल्पाविरोधात प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी मुला-बाळांसह महामार्गावर ठिय्या आंदोलन करून महामार्गाचे काम बंद पाडले. प्रकल्पासाठी जमीन देऊनही नुकसानभरपाई न देता फळझाडांची कत्तल करून शेतजमिनीवर बुलडोझर फिरविल्याचा आरोप प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केला.

मुंबई-बडोदा महामार्गाचे काम गेली दोन ते तीन वर्षांपासून रखडले होते. हे काम तीन दिवसांपूर्वी प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात सुरू करण्याचा प्रयत्न



करण्यात आला. मात्र, तलासरी तालुक्यातील कोचाई येथील शेतकऱ्यांनी काम बंद पाडले. या गावातील २५ शेतकऱ्यांना संपूर्ण मोबदला मिळाला नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. नुकसानभरपाई न देता फळझाड आणि शेकडो झाडांची कत्तल करून शेतजमिनीवर बुलडोझर चालवल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. जोपर्यंत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात नाही, तोपर्यंत महामार्गाचे काम रोखणार असल्याचा शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे. कोणताही अनूचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

## अंबाबाई मंदिर आवारात दोन शिवलिंग आढळले

■ कोल्हापूर

**करवीर** निवासिनी श्री अंबाबाई मंदिर आवारातील मणिकर्णिका कुंड परिसरात छोट्या दोन देवळीत शिवलिंग आढळले आहे. माऊली लॉजच्या खाली असलेल्या दगडी भिंतींसमोरील माती, दगडाचा ढिगारा काढताना हे शिवलिंग दिसले. मात्र तिसरी देवळी रिकामी दिसली. अंबाबाई मंदिर आवारातील मणिकर्णिका कुंडाच्या जतन संवर्धनाचे काम पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीकडून सुरू करण्यात आले आहे. अत्यंत कासवगतीने सुरू असलेल्या या कामात सध्या कुंडाच्या परिसरातील ढिगारा हटविण्यात येत आहे. हे काम करत असताना माऊली लॉजच्या खालच्या बाजूला असलेल्या मणिकर्णिका कुंडाच्या दगडी भिंतींमध्ये तीन देवळी आढळल्या. यातील दोन देवळींमध्ये शिवलिंग आहे.

## ५ जानेवारीपर्यंत आरक्षण द्या मनोज जरांगे यांचा नवा इशारा

■ जालना



**मुंबईच्या** आझाद मैदानावर शपथविधी सोहळा पार पडल्यानंतर आज महायुती सरकारला शुभेच्छा देत मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी राज्य सरकारला नवा इशारा दिला. मनोज जरांगे-पाटील म्हणाले की, राज्यातील सरकार आता स्थापन झाले आहे. आता जनतेचे प्रश्न मार्गी काढणे गरजेचे आहे. मराठा समाजात खदखद आहे, ही त्यांना दिसत नसेल. मात्र ती एक भयंकर लाट आहे. जरांगे-पाटील म्हणाले की, ५ डिसेंबरला त्यांचे सरकार स्थापन झाले आहे. त्यांना आम्ही शुभेच्छा दिल्या आहेत. मनापासून तिघांचे अभिनंदन केले आहे. पुढच्या काळात त्यांना गोरगरिबांचे प्रश्न मार्गी काढायचे आहेत. ५ जानेवारीपर्यंत १ महिन्यात मराठा आरक्षणाचा विषय मार्गी लावायचा आहे. नाहीतर मराठा समाज आंदोलन उभे राहून सरकारला हैराण करेल. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदी बसणे म्हणजे आता काटेरी खुर्चीवर विराजमान होण्यासारखेच आहे. देवेंद्र फडणवीस त्या महान खुर्चीवर पुन्हा विराजमान झाले आहेत.

## नासाच्या चांद्रमोहिमेला विलंब आता एप्रिल २०२६ मध्ये उड्डाण

■ न्यूयॉर्क

**अमेरिकन** अवकाश संशोधन संस्था नासाची 'आर्टेमिस' ही चांद्रमोहीम २०२५ मध्ये प्रक्षेपित करण्यात येणार होती. मात्र ओरियन क्रू कॅप्सूलच्या हिट शील्डसह अन्य समस्येमुळे ही चांद्रमोहीम पूर्वी नियोजित वेळेपेक्षा एक वर्ष उशिरा सुरू होणार आहे.

नासाचे प्रशासक बिल नेल्सन यांनी म्हटले की, नासाच्या 'आर्टेमिस' या चांद्रमोहिमेला विलंब होणार आहे. १९७२ नंतर प्रथमच चांद्रमोहीम पुढे ढकलली आहे. आता ही मोहीम एप्रिल २०२६ मध्ये निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतरचे चांद्रयान लँडिंग २०२७ मध्ये होणार आहे. चांद्रमोहीम विलंब होण्याला ओरियन क्रू कॅप्सूलच्या हिट शील्डसह अन्य समस्या कारणीभूत आहेत. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नासाने आर्टेमिस २ साठी कॅप्सूलच्या रिटर्न ट्रॅजेक्टरीमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला. अवकाश प्रक्षेपणाचा वाढता खर्चदेखील अवकाश मोहिमेला विलंब होण्याचे एक कारण आहे.

## वाराणशीच्या 'युपी कॉलेज'मध्ये शुक्रवारच्या नमाजावरून पुन्हा तणाव

■ वाराणसी

**वाराणसीच्या** उदय प्रताप कॉलेजमध्ये शुक्रवारी नमाजावरून पुन्हा एकदा वाद उफाळून आला. या कॉलेज परिसरातील मशिदीत विद्यार्थ्यांनी मस्लिमांना नमाज पढू दिली नाही, कॉलेज प्रशासनाने नमाजासाठी मुस्लिमांना परवानगी दिली होती.

उदय प्रताप कॉलेजच्या परिसरात ही मशीद असून, तिथे होणाऱ्या नमाजावरून काही दिवसांपूर्वी वाद उद्भवला आहे. इथे विद्यार्थ्यांनी हनुमान चालिसा



म्हणायला सुरुवात केल्यापासून वाद अधिक चिघळला आहे. आज शुक्रवारच्या नमाजावेळी विद्यार्थ्यांनी मोठा गोंधळ घातला. त्यांनी कॉलेज परिसरात जमून धुडगूस घालायला सुरुवात केली. त्यांच्या हातात भगवे झेंडे होते. ते घोषणाबाजी करत होते. त्यावेळी तिथे पोलीस बंदोबस्त होता. विद्यार्थ्यांना अडवण्यासाठी त्यांनी बॅरिकेड उभे केले होते. विद्यार्थ्यांनी ते तोडून कॉलेजमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांबरोबर वकीलही मोठ्या संख्येने तिथे आले होते.

## सांगलीत उपसरपंचाची हत्या गळा चिरून मृतदेह रस्त्यावर फेकला

■ सांगली



**खानापूर** तालुक्यातील घानवडे गावाच्या माजी उपसरपंचाची गळा चिरून हत्या करण्यात आली. बापूराव देवप्पा चव्हाण असे हत्या करण्यात आलेल्या उपसरपंचाचे नाव आहे. गार्डी नेवरी रस्त्यावर त्यांचा मृतदेह आढळून आला.

हत्येबाबतची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध पथके रवाना करण्यात आली. मृत बापूराव चव्हाण यांना राजकीय पार्श्वभूमी होती, त्यांचे ज्वेलरीचे दुकान होते. त्यामुळे त्यांची हत्या राजकीय सूडातून झाली की व्यावसायिक कारणातून त्यांचा जीव घेण्यात आला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी विटा पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले असून, अधिक तपास करत आहेत.